कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे

# संपर्क




• पुणे • वर्ष १४ वे • अंक २ रा • जुलै - सप्टेंबर २०१८ • किंमत रु. २०/- • पृष्ठसंख्या ४० • वार्षिक वर्गणी रु. १००/-



संपर्कात राहू या !

संपर्क वाढवू या !!



1st Time with Silver Particles
Pitambari Klenz Nanowash
Silver Particles Shield
डाग आणि बॅक्टेरियाचा
त्वरित नाश,
सफाई चा सम्राट,
क्लेंझ नॅनो वॉश!
Silver Power Washing Technology
Detergent for Top & Front load machines.
Pitambari Klenz Nanowash
Net. Qty. 1 Kg
Remove's invisible Dirt & Bacteria
24hr Protection from Bacteria
Pitambari R & D CENTER
Power of 5
1 Silver Power Technology
2 Fabric Guard Formula
3 Keep Clothes Bright
4 Water Softening Agent
5 Long lasting Fragrance
Shop now with FREE SHIPPING
www.pitambari.com/shop
Pitambari Products Pvt. Ltd.
CIN: U24239MH1989PTC051314.
Thane: 022-6703 5555, CRM: 022- 6703 5564, 5699, Pune: 9921001222
Toll Free: 180030701044 • Now Shop Online On : www.pitambari.com/shop & www.amazon.in

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे

# संपर्क

संपर्कात राहू या ! संपर्क वाढवू या !!

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ ॐ स्थापना १९९१



कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने कऱ्हाडे ज्ञाती बांधवांसाठी
चालविलेले नियतकालिक (खासगी वितरणासाठी)

वर्ष १४ वे | जुलै – सप्टेंबर २०१८ | अंक २ रा

अध्यक्ष : श्री. विजय आंबर्डेकर
मोबा. : ९८१९८८५६६५

सचिव : श्री. गणेश गुर्जर
मोबा. : ९८९०९९०११३

कोषाध्यक्ष : श्री. संजय आंबर्डेकर
मोबा. : ९८२०४ १७९८१

संस्था नोंदणी क्र. महा–१४३६/२०१५ दि. २०/१०/१५ पुणे विश्वस्त संस्था नोंदणी क्र एफ४६५२३ पी दि. ३/३/२०१६

संपादक : श्री. श्रीगजानन गुर्जर
पुणे ९९७०१ ७४८१८ / ८८०६३ ९५८८० (WhatsApp)

शहर प्रतिनिधी

श्री. प्रसाद पंडीत, मुंबई, ९८६९१ ५५२१५
श्री. चंद्रशेखर जोशी, बेळगांव, ९४४९० ५१६५३
श्री. प्रदीप हळबे, डोंबिवली, ९८३३१ ६३६५९
श्री. मनिष नवाथे, नागपूर ९८५०३ ३१४६० *
सौ. अंजली माईणकर, सोलापूर, ७७७३९ ७३६७९
श्री. भालचंद्र करंबेळकर, सातारा, ९०११० ६३०३०
श्री. दिलीप ढवळे, रत्नागिरी, ९४२२५ ४९०८५
श्री. मिलिंद पावनगडकर, कोल्हापूर, ९२२५८ ००५८७
श्री. जयंत लघाटे, मुलुंड, ९९६९० ३७३४१
श्री. हेमंत हिर्लेकर, पुणे, ९८२२० ४२८६३
श्री. निळकंठ मुळये, बडोदा, ९८२५६ ८५९७३
श्री. शरद खांडेकर, सांगली, ९८२२१ ९५८९२
श्री. गजानन सायनेकर, गोवा, ९९२३७ ९९६९७
श्री. विनायक उमर्ये, जि. सिंधुदुर्ग, ९४२३८ ८०१३८
श्री. अजित सरवटे, ठाणे, ९९८७२ ०५६९०
सौ. सुप्रिया फणसळकर, नाशिक, ९४०३१ ४८७७५

ऑफिस संपर्क : ०२०–२४४३२४४३ / मो. ८१४९९०७७८९
email : bkbmsindia@gmail.com

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे संपर्क हे त्रैमासिक मालक, कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ (ट्रस्ट) यांचेसाठी प्रकाशक श्री गणेश गुर्जर यांनी मुद्रक श्री जे प्रिंटर्स प्रा. लि., सदाशिव पेठ, पुणे येथे छापून ४३७, नारायण पेठ, अनिश प्रासाद अपार्टमेंट, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक – श्री. श्रीगजानन गुर्जर

## आवाहन

'संपर्क'च्या सर्व वर्गणीदार, जाहिरातदार, हितचिंतक यांना आवाहन करण्यात येते की आपली वार्षिक वर्गणी आता रु. 300/-, रु. 500/- अशी किमान तीन वर्षे व कमाल पाच वर्षेसाठी स्वीकारली जाईल. कृपया बँकेमध्ये कोणीही स्वत: रक्कम न भरता आपल्या शहर प्रतिनिधींकडे संपर्क साधून जमा करावी (पुण्यातील वर्गणीदारांनी त्यांची संपर्क वर्गणी; कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे–30 च्या कार्यालयात येऊन भरावी. त्यांचे स्वागत आहे). शहर प्रतिनिधींनी सर्व वर्गणी गोळा झाल्यावर सभासदांची यादी, वर्गणी रक्कम आणि रक्कम जमा केलेल्या पावतीची झेरॉक्स प्रत पाठवावी. या दोन्ही गोष्टी आल्याशिवाय वर्गणी सभासदाच्या खात्यावर जमा होऊ शकणार नाही. महासंघाचे खाते बँक ऑफ इंडिया, कर्वेनगर, पुणे येथे असून त्याचा क्रमांक 055210110004008 असा आहे. IFSC Code BKID0000552 आहे. जाहिरातदारांनी आपल्या जाहिरातीचा मसुदा व चेक फक्त कार्यालयांतच पाठवावा. कृपया मनिऑर्डर पाठवू नये.

संपादक : श्रीगजानन गुर्जर

### जाहिरातीचे दर

| पान | एकवेळ | चारवेळा |
|---|---|---|
| पाव | रु. ५००/- | रु. २०००/- |
| अर्धा | रु. १०००/- | रु. ४०००/- |
| पूर्ण | रु. २०००/- | रु. ८०००/- |
| शुभेच्छा | रु. ५००/- | रु. २०००/- |
| पूर्ण पान रंगीत | रु. ३०००/- | रु. १२०००/- |
| पृष्ठदान | रु. २००/- | - |

**नियतकालिकाचे नाव :** कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे'संपर्क'
**पत्ता :** कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ,
**द्वारा :** कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ, 'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ, पुणे – ४११ ०३०
**संपादक :** श्री. श्रीगजानन गुर्जर
**मुद्रक :** श्री जे प्रिंटर्स प्रा. लि.
१४१६, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

संपर्क

# अनुक्रमणिका


- संपादकीय ३
- कै. डॉ. मधुकर यशवंत नवरे ४
- तो आणि ते ९
- विड्याचे पान – शास्त्रोक्त व वैज्ञानिक महती १०
- पसायदान – मनाला थक्क करणारी विश्वप्रार्थना ११
- पंचतंत्र १२
- मीनाक्षी अन्नम मंदिराचा इतिहास १३
- बस कंडक्टर १४
- विष्णुसहस्त्रनामाची उत्पत्ती १५
- बोलणं – एक कला १६
- तांबे परिवाराला, ग्रीन सोसायटी पर्यावरण–पुरस्कार १७
- Karhada Parishad Mangaluru १८
- न मानलेल्या आभाराची गोष्ट १९
- वाचकांचा अभिप्राय २०
- संस्थावृत्त – कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुलुंड २१
  - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, सातारा २१
  - क. ब्रा. सेवा मंडळ, डोंबिवली (पू.) २२
  - क. ब्रा. सेवा मंडळ, डोंबिवली (पू.) – मकर संक्रांत २०१८ २२
  - क. ब्रा. पुणे, वासंतिक मेळावा २०१८ २३
  - क. ब्रा. पुणे – राणी लक्ष्मीबाई स्मृतिदिन २४
  - क. ब्रा. संघ, ठाणे – वासंतिक कार्यक्रम २४
  - रत्नागिरी कऱ्हाडे ब्राह्मण सहकारी संघातर्फे राणी लक्ष्मीबाई पुरस्कार प्रदान २५
  - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबई – चैत्रगौर वासंतिक हळदीकुंकू समारंभ २६
- अमुचा गाव २७
- सासू–सासऱ्यांसाठी मौलिक सल्ला....लेखाची दुसरी बाजू २८
- 'आचमन' का करायचे? २९
- फणस ३०
- श्री. सतीशचंद्र विद्याधर हर्डीकर ३२
- रसा रक्षणार्थ ३२
- पितांबरीतर्फे देवभक्ती अगरबत्ती निर्मितीच्या कारखान्याचा शुभारंभ ३३
- लक्ष्मणरावांची उद्यमनगरी ३४
- पक्ष्यांची मरणोन्नवस्था ३५
- भास ३५
- रताळ्याची कचोरी ३५


सदर नियतकालिकातील मजकूराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. – संपादक

# संपादकीय

नमस्कार,

जुलै-सप्टेंबर २०१८ चा 'संपर्क' त्रैमासिकाचा अंक, येत्या देवशयनी आषाढी एकादशीपर्यंत आपल्याला मिळावा अशी अपेक्षा आहे. आषाढी एकादशीच्या आपल्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!


दिनांक २७ मे २०१८ रोजी रत्नागिरी येथे झालेल्या महासंघाच्या बैठकीत महासंघाचे सचिव श्री. गणेश गुर्जर ह्यांनी, 'संपर्क' त्रैमासिकासाठी जाहिरात देण्याचे आवाहन ज्ञातिबांधवांना, विशेषतः उद्योजक बंधू/भगिनींना केले होते. पण त्याला अद्याप म्हणावा तेवढा प्रतिसाद मिळालेला नाही. ज्यांना शक्य आहे त्यांनी याबाबतीत विचार करून आपले योगदान द्यावे. अशी आम्ही आपणास विनंती करतो. **वर्गणीदार सभासद 'पृष्ठदान' तर नक्कीच करू शकतात.** गेल्या सहा वर्षात जाहिरातीच्या दरांमध्ये आम्ही कोणतीही वाढ केली नव्हती. परंतु सध्याच्या वाढलेल्या खर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठी आम्हाला नाईलाजास्तव जाहिरातीच्या दरात थोडी वाढ करावी लागत आहे. आपण आम्हाला समजून घ्याल असा विश्वास वाटतो.

रत्नागिरी येथे झालेली महासंघाची बैठक आणि त्यानंतर झालेला विशेष कार्यक्रम, उत्तम नियोजन आणि आदरातिथ्यामुळे; उपस्थित असलेल्या सर्व सभासदांना कायम लक्षात राहिल. रत्नागिरी संघाचे अध्यक्ष श्री. माधव हिर्लेकर आणि त्यांचे सर्व सहकारी ह्यांनी आपल्या कुटुंबीयांसमवेत दिलेल्या योगदानाचे करावे तेवढे कौतुक थोडेच आहे. या संपूर्ण कार्यक्रमाचा वृत्तांत ह्या अंकात आपल्या माहितीसाठी सविस्तर दिला आहे.

'संस्थावृत्ता' शिवाय इतरही उद्बोधक माहिती, सभासदांचे लेख, कविता, स्फुटलेख, रेसीपी, व्यक्ती परिचय वगैरे साहित्याचा समावेश आम्ही अंकात करत असतो. सभासदांना विनंती की, त्यांनी सुद्धा आपले साहित्य आमच्याकडे पाठवावे. आम्ही त्याला योग्य प्रसिद्धी देण्याचा कायमच प्रयत्न करतो. ज्या सभासदांची 'संपर्क'ची वर्गणी संपली आहे, त्यांनी नुतणीकरण करून आपले सभासदत्व कायम ठेवावे. असे आवाहन आम्ही यानिमित्ताने करत आहोत.

यापुढील काळात श्रावण, भाद्रपद महिन्यात येणारे; नागपंचमी, नारळी / राखी पोर्णिमा, गणेशोत्सव वगैरे सणांसाठी आमच्या सर्व सभासद वर्गणीदारांना, जाहिरातदारांना आणि हितचिंतकांना आमच्या खूप खूप शुभेच्छा.

श्रीगजानन गुर्जर
संपादक




# कै. डॉ. मधुकर यशवंत नवरे

– श्री. हणमंत शंकर रायकर

मुंबईत वास्तव्य असताना कार्यालयीन कामानिमित्त मुंबई–गोवा हा विमान प्रवास खूप वेळा करावा लागत असे. परंतु राजापूरला स्थायिक झाल्यावर गोव्याला जाण्याचा प्रसंग फारसा येत नसे. आमची कुलदेवता ''श्री महालसा'' ही म्हार्दोळ, गोवा येथे असल्यामुळे राजापूर येथे स्थायिक झाल्यावर आम्ही एकदा मोटारीने राजापूर–गोवा प्रवास करीत होतो. गोव्यात जाताना कणकवली येथे सकाळी नाश्ता घेण्यासाठी गाडी थांबविली होती. हॉटेलच्या समोरच मला ''डॉ. नवरे हॉस्पिटल'' नावाचा मोठा फलक दिसला. तो फलक पाहात असतानाच मी शाळेत असताना आमच्या घराजवळ नवऱ्यांचे घर होते. त्याची मला आठवण झाली. अर्थात त्यावेळी ते मला सिनीअर होते. नदीला मोठा पूर आलेला असताना ते इतर मुलांबरोबर पोहायला येत असत. ते अट्टल पोहणारे होते. तसेच बेडूक पकडून त्याचे Disection करताना मी त्यांना पाहिले होते. अशा कितीतरी गोष्टींची मला आठवण झाली व ''डॉ. नवरे हास्पिटल'' म्हणजे या नवरेंपैकीच कोणी आहेत का याची सहज चौकशी करावी म्हणून आमचा नाश्ता झाल्यावर त्या इमारतीत मी थेट प्रवेश केला.

मी त्यांच्या हॉस्पिटलच्या पहिल्या मजल्यावर गेल्यावर मला डॉ. नवरे यांना भेटावयाचे आहे असे सांगितल्यावर एक तरुण मुलगा मला भेटायला आला. मी माझे नाव सांगितले व कदाचित आपले वडील श्री. मधुकर नवरे हे राजापूरचे आहेत असे मला वाटले म्हणून आपल्या हॉस्पिटलमध्ये आलो होतो, परंतु मला माफ करा. माझा काहीतरी गैरसमज झाला असावा असे त्याना सांगून बाहेर



निघण्याचा निर्णय घेतला. परंतु मी ''बरोबर'' आहे व आम्ही ''नवरे राजापूरचेच आहोत'' असे सांगून त्यांनी आपल्या वडिलांना बोलावून घेतले. त्यांची व माझी समोरासमोर भेट झाल्यावर ''आपण बाळ्या रायकर काय?'' असे विचारल्यावर माझी खात्री झाली की हेच ते नवरेसर. यांना मी आज जवळजवळ ५५ वर्षांनी भेटत होतो.

ओळख पटल्यावर खूप गप्पागोष्टी झाल्या व दोन गाववाले एकत्र भेटल्यावर कशा प्रकारे वेळ निघून गेला हे लक्षातच आले नाही. ही आमची शाळा संपल्यावर झालेली पहिली भेट! अतिशय आनंद वाटला. डॉ. नवरे हेही माझ्याशी खूप मनमोकळेपणाने बोलले. त्यांनी मला त्यांच्या मुलाची डॉ. समीर M.B.B.S., D. Ortho. अस्थिरोग तज्ज्ञ व त्यांच्या सहचारिणी डॉ. सौ. अश्विनी M.B.B.S.,M.S., प्रसूतीशास्त्र व स्त्रीरोगतज्ज्ञ यांच्याशी परिचय करून दिला.

''उत्तुंग व्यक्तिमत्त्वे'' शोधत असताना मला डॉ. नवरे सरांची आठवण झाली व फोनवरूनच माझ्या पुस्तकाची कल्पना त्यांना सांगितली. अत्यंत नम्रपणे ते म्हणाले की ''मी काहीच केलेले नाही त्यामुळे मी ''उत्तुंग व्यक्तिमत्त्व'' मध्ये बसत नाही वगैरे.'' परंतु माझा निर्णय पक्का होता की, माझ्या या पुस्तकात आमच्याच शाळेचे माजी विद्यार्थी डॉ. नवरे सरांचा समावेश करावयाचाच. त्यामुळे प्रत्यक्ष भेटीसाठी म्हणून मी २० नोव्हेंबर २०१३ रोजी कणकवली येथे त्यांची भेट घेतली. या पहिल्याच मुलाखतीत माझ्या असे लक्षात आले की मी केलेली त्यांची निवड अजिबात चुकीची नव्हती आणि आपणही माझ्याशी सहमत व्हाल अशी मला खात्री वाटते.

माझा कोकणातील माणसांच्या कर्तृत्वावर व बुद्धिमत्तेवर पूर्ण विश्वास आहे. दुर्दैवाने पूर्वी अशा हुशार लोकांना चांगल्या संधी उपलब्ध नसत. त्यामुळे त्यांना शहरात जावे लागत असे.

डॉ. नवरेसरांचा जन्मदिन आहे १२/०१/१९३६. जन्मगाव राजापूर. जन्मतारीख सागतानाच डॉक्टरांनी त्यांची मला एक आठवण सांगितली. ''साताऱ्याला वैद्यकीय शिक्षण घेत असताना कर्मवीर भाऊराव पाटील यांचे दर्शन होत असे. त्या कर्मवीर भाऊराव पाटलांच्या कॉलेजचे प्राचार्य होते बॅ. पी. जी. पाटीलसर. एका वर्षी स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे होते केंद्रीय अर्थमंत्री कै. सी. डी. देशमुख. प्रमुख पाहुण्यांची ओळख करून देताना प्राचार्य पाटीलसर यांनी श्री. स्वामी विवेकानंदांचा जन्म १२ जानेवारी मकरसंक्रांतीला झाला आहे. श्री. चिंतामणराव देशमुख यांचा जन्मही १२ जानेवारी मकरसंक्रांतीला झाला आहे. ज्यांचा जन्म मकरसंक्रांतीला होतो त्यांची कीर्ती दिगंत होते.'' असे सांगितले.

माझा जन्म १२ जानेवारीचा परंतु हल्ली मकरसंक्रांत १४ जानेवारीला येते!

डॉ. नवरे यांचे वडील हे मराठी दुसरी शिकलेले असावेत. ते सरकारी बांधकामे, रस्ते, इमारती, छोटे पूल इत्यादी कामे व शेती करीत असत. त्यांची आई निरक्षर होती, पण ती उत्तम गृहिणी होती. तिच्या बोलण्यात उपमा, उत्प्रेक्षा, यमक, म्हणी व बऱ्याच बोधप्रद गोष्टी असत. काटकसर, वस्तू फुकट न घालविणे याच्याकडे त्या विशेष लक्ष देत. डॉक्टरांच्या जन्मानंतर ते काही दिवसांनी त्यांच्या ''मंदरूळ'' या खेडेगावी गेले. तेथे त्यांची शेती होती. तिथे त्यांचे वडील व काका, कात पाडण्याचे व गुळवेल सत्त्व काढण्याचे काम करीत असत. तिथं दुसरीपर्यंत शिक्षण झाल्यानंतर पुढच्या शिक्षणासाठी त्यांच्या काकांनी त्यांना पनवेल येथे नेले. परंतु पाच-सहा महिन्यांनंतर प्लेग आल्यामुळे कुठल्याही परीक्षा न देता त्यांच्या खेडेगावी आले.

दोन वर्षांनंतर त्यांनी शिक्षणासाठी परत राजापूरला बिऱ्हाड केले. मराठी चौथी व पुढे इंग्रजी पहिली, दुसरी, तिसरी म्हणजेच सातवी ते अकरावीपर्यंत तिथे त्यांचे माध्यमिक शिक्षण झाले.

एस.एस.सी. परीक्षावेळची त्यांनी एक आठवण सांगितली. ''आमच्या वेळी शाळेत पेन वापरण्यास बंदी होती. दौत आणि टांक याने पेपर लिहावे लागत. अकरावीमध्ये पेनाने लिहिण्याची परवानगी मिळाली. त्यावेळी मला भावाने पहिले पेन घेऊन दिले. त्या पेनानेच मी अकरावीचे पेपर लिहिले. इंग्रजीचा पेपर लिहिताना पेन खाली पडून त्याचे नीब मोडले. मी तसाच बसून राहिलो. पुढील पेपर लिहिता न आल्यामुळे ३३ टक्के मार्कस् पडले व मी नापास झालो. माझ्या पेनचे नाव Jwell Pen Co. Lodon No. 456 असे होते. माझे ते अतिशय आवडते पेन होते''.

पुढे ऑक्टोबर मध्ये डॉ. नवरे एसएससी पास झाले. त्यावेळी त्यांना त्यांच्या वर्गात सर्वात जास्त मार्कस् मिळाले होते. मॅट्रिकनंतर रत्नागिरीला त्यांनी सायन्स शाखेत पहिल्या वर्षाला (F.Y.) प्रवेश घेतला. तेथेच ते दुसऱ्या वर्षी इंटर सायन्स (Inter Science) 'बी. ग्रुप' घेऊन पास झाले. इंटर सायन्स 'बी ग्रुप' म्हणजे इंटरला गणित विषय नसतो. त्यासाठी वैद्यकीय शाखेकडे जावे लागते. ''माझा गणित विषय आवडता होता. वडील शिकलेले नसले तरी कंत्राटदार (कान्ट्रॅक्टर) असल्यामुळे इंजिनिअर लोकांशी संबंध होता व मी इंजिनिअर व्हावे अशी त्यांची इच्छा होती. आमच्या घरात नामांकित वैद्य होऊन गेले. परंतु, त्या कोणाचाही वैद्यकीय व्यवसाय चालला नाही. व्यवसाय म्हणून त्यांनी कधी केलाच नाही. तुझं कसं काय होणार? पण मला वैद्यकीय शाखेशिवाय दुसरा पर्याय नव्हता.'' ते फार निराश झाले.

१९५६ मध्ये डॉक्टरांनी ''आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय'' सातारा येथे वैद्यकीय शाखेत प्रवेश घेतला. हा मिश्र कोर्स होता. ॲलोपथी व आयुर्वेदिक असे दोनही पूर्ण विषय त्यात शिकविले जात. १९६२ साली चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होऊन G.F.A.M. ही डिग्री मिळविली. पुढे त्यांनी रत्नागिरी सिव्हिल हॉस्पिटल येथे मेडिकल ऑफिसर म्हणून नोकरी केली. सुमारे दोन वर्षांनंतर नोकरी सोडून 'मातृमंदिर' देवरूख येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यभार स्वीकारला.

'मातृमंदिर' हे ग्रामीण भागातील सेवाभावी संस्थेचे हॉस्पिटल आहे. तेथे श्रीमती इंदिराबाई हळबे यांनी आकस्मिक पती निधनानंतर नागपूर येथे जाऊन नर्सिंग कोर्स करून देवरूखसारख्या खेड्यात येऊन खेड्यांतील स्त्रियांच्या प्रसूती करण्यास सुरुवात केली. आज ही संस्था बरीच लोकोपयोगी कामे करते. इंदिराबाई हळबे यांना ''जमनालाल बजाज'' हा पुरस्कार मिळाला होता. अनेक उत्तुंग व्यक्तिमत्त्वे जसे कै. श्री. आप्पासाहेब पटवर्धन, बॅ. नाथ पै, श्री मधू दंडवते, श्री. प्रभाकरपंत कोरगावकर ही माणसे संस्थेला भेट देत असत. त्यामुळे अशा माणसांना डॉक्टरांनी जवळून पाहले आहे. मातृमंदिर संस्थेच्या वैद्यकीय कार्याशिवाय शेती, अनाथाश्रम, बालविकास केंद्रे, बालवाड्या, वाचनालये, आरोग्यकेंद्रे इत्यादी लोकोपयोगी उपक्रम आहेत. डॉक्टरांनी उरलेल्या वेळेत या प्रत्येक विभागात जातीने काम केले आहे. अनाथाश्रमातील मुलांचे केसही कापलेले आहेत.

श्रीमती हळबे यांच्याच परिचयातील एक सुविद्य मुलगी विभावरी हिचे स्थळ डॉक्टरांसाठी आले. ती मुलगी शिक्षिका होती. तिच्याशी २२ मे १९६६ साली डॉक्टरांचे शुभमंगल झाले. सौ. विभावरी नवरे यांनी आयुष्यभर डॉक्टरांना साथ दिली, तीही कोणतीही तक्रार न करता. रुग्णांची सेवा करण्याच्या व्रतामध्ये सौ. विभावरी यांनी मोलाची मदत केली. पुढे काही घरगुती अडचणींमुळे डॉक्टरांनी 'मातृमंदिर' ही संस्था सोडली.

१९ जानेवारी १९६८ साली डॉक्टर कणकवली येथे तालुका डिस्पेन्सरीत वैद्यकीय अधिकारी म्हणून हजर झाले. तेथे त्यांनी अनेक अवघड व गुंतागुंतीच्या प्रसूती केल्या. त्यांच्या आजपर्यंतच्या सर्व ठिकाणच्या मिळून ३५ ते ४० वर्षांच्या काळात सुमारे अकरा हजारांच्या पुढे प्रसूती झाल्या. बहुतेक सुखप्रसूती (Normal Delivery) झाल्या. भूलतज्ञ (ॲनेस्थेटीक) नसताना, रक्त देण्याची सोय नसताना, लोकल ॲनेस्थेशियाखाली सिझेरियनसारख्या शस्त्रक्रियाही त्यांनी यशस्वी पार पाडल्या आहेत. गोरगरिबांची सेवा केल्यामुळे

अल्पावधीतच डॉ. नवरे हे नाव कणकवलीमध्ये लोकप्रिय झाले.

सप्टेंबर १९६८ साली सर्वपित्री अमावास्येच्या दिवशी गडनदी पुलावर भजनी मंडळाच्या ट्रकला पुलावरून खाली कोसळून अपघात झाला. ट्रकमध्ये १२२ लोक होते. ५२ लोक हॉस्पिटलमध्ये येईपर्यंत मृत होते. आजच्या सारख्या सर्व सोई -सुविधा त्यावेळी नव्हत्या. फोनही नव्हते. अनेक जखमी एकाचवेळी कणकवली हॉस्पिटल आवारात होते. अशा परिस्थितीत व तुटपुंज्या सामुग्रीत सर्व रुग्णांवर उपचार करण्यात पूर्ण रात्र गेली. मालवणच्या डॉ. सौ. राजे, वेंगुर्ले येथील मिशन हॉस्पिटलचे डॉ. सिंहन् यांनी मोलाची मदत केली. इतर डॉक्टरही ज्यांना ही दुःखद बातमी कळली तेही मदतीला आले. ऑपरेशनची आवश्यकता असलेल्या व अतिगंभीर रुग्णांना वेंगुर्ले मिशन हॉस्पिटल, सावंतवाडी कॉलेज हॉस्पिटल येथे पाठविण्यात आले.

कणकवलीच्या सरकारी रुग्णालयात त्यांनी अनेक स्त्री व पुरुष यांच्यावर संततीप्रतिबंध शस्त्रक्रिया केल्या. एके दिवशी तर डॉक्टरांनी कॅम्पमध्ये पुरुषांच्या १०८ नसबंदी (Vasectomy) शस्त्रक्रिया केल्या.

एकदा त्यांच्या चुलतभावाच्या पोटात दुखत होते, हे समजल्यावर डॉक्टर लगेच राजापूरला गेले परंतु तिथे जाण्यापूर्वीच भावाचे निधन झाले होते. त्याच्या जठराला भोक पडले होते (Gastric Perforation) दुसऱ्या दिवशी कुटुंब कल्याण शिबिर होते. तरी भावनांपेक्षा कर्तव्य श्रेष्ठ मानून डॉक्टरांनी शिबिर यशस्वी केले.

दवाखान्यात दर दिवशी सुमारे १५० रुग्ण ओ.पी.डी. मध्ये असत. सुखरूप बाळंतपण करणारे डॉक्टर म्हणून त्यांनी नावलौकिक मिळविला. त्यामुळे प्रसूती वॉर्ड तर सतत भरलेला असे. (डॉक्टर सांगतात "मला मागाहून कोठून तरी समजले की माझ्याकडे येणाऱ्या प्रसूतीमध्ये मुलगे जास्त होते, परंतु तेव्हा सोनोग्राफी नव्हती तो योगायोग असावा.")

डॉ. नवरे यांना आपल्या मूळ गावी राजापूर येथे हॉस्पिटल सुरू करावयाचे होते. म्हणून जागा घेऊन पूर्वतयारीही झाली होती. परंतु कणकवली येथील लोकांनी प्रयत्न करून तेथे जागेपासून उपलब्धता करून दिली. सन १९७३ साली त्यांची बांदा येथे बदली झाली. त्यावेळी त्यांनी नोकरी सोडून स्वतः चा दवाखाना व हॉस्पिटल सुरू करण्याचा ठाम निर्णय घेतला. कै. काका मिशाळ यांनी यासाठी तात्पुरती जगा दिली. कै. दाजी नाईक यांनी कै. अण्णा तावडे यांना भेटून डॉक्टरांना जागा देण्याची विनंती केली. व त्यांनी कोणतेही आढेवेढे न घेता ९ गुंठे जागा तत्काळ दिली. श्री. दाजी नाईक यांनी त्वरित दवाखान्याचे काम करून दिले. ऑगस्ट १९७३ मध्ये स्वतःच्या जागेत डॉ. नवरे हॉस्पिटलचा शुभारंभ झाला तोही नावाची पाटी न लावता. स्वतःचे नाव किंवा हॉस्पिटलची पाटी कुठेही लावावयाची नाही असा त्यांचा पूर्वीपासूनच निश्चय होता आणि त्यांच्या कारकिर्दीपर्यंत त्यांनी तो पाळला. दवाखान्यात बाकावर बसलेले पेशंट हीच त्यांची पाटी होती!

डॉक्टरांचे स्वतःचे हॉस्पिटल चालू झाले, दिवसाचे २४ तास अव्याहत रुग्णसेवा करण्याची त्यांची तयारी असे. त्यांना सर्व रुग्णांविषयी आपुलकी होती. त्यामुळे संपूर्ण तालुक्यातच नव्हे तर आजूबाजूला सुद्धा डॉक्टरांचा नावलौकिक झाला. आळस त्यांना ठाऊकच नाही. दवाखान्यात नोकर आले नाहीत तर डॉक्टर स्वच्छतेची कामे स्वतः करीत डोळ्यांचे तज्ज्ञ डॉ. कै. आचवल यांनीही अगदी माफक फी घेऊन डॉ. नवरे यांच्याबरोबर रुग्णसेवा केली. आर्थिक परिस्थिती नसलेल्या गरीब रुग्णांना आठ दिवस दवाखान्यात राहण्याची सोय करून डोळ्यांच्या मोफत शस्त्रक्रिया डॉ. आचवल यांच्या साहाय्याने केल्या. डॉक्टरही डोळ्यांचे रूग्ण तपासत असत.

काही अगदी अवघड केसेस त्यांनी हाताळल्या. एका माणसावर वाघाने हल्ला केला, नाक ओरबाडले. ते अक्षरशः लोंबत होते (नाकामध्ये नळ्या ठेवून तोंडाने श्वास घ्यायला लावून) त्याकाळी डॉक्टरांनी त्या नाकाची प्लॅस्टिक सर्जरी करुन ते पूर्ववत करून दिले. सर्पदंशाच्या अनेक केसेस त्यांनी हाताळल्या. हाड मोडणे, सांधे निखळणे, नाक, कानातल्या फॉरेन बॉडी काढणे अशा केसेस डॉक्टर सहज हाताळतात.

प्रसूतीमध्ये तर डॉक्टरांचा हातखंडा होता, अनेक अवघड प्रसुती, मग पायाळू मूल असो अथवा अतिरक्तदाब वाढलेली स्त्री असो, प्रत्येक प्रसूती त्यांनी सुरक्षित करून दिली.

डॉक्टर नवरे हे साधी राहणी आणि उच्च विचारसरणीचे मूर्तिमंत प्रतीक आहेत. रुग्णांबरोबरच त्यांच्या कुटुंबीयांची त्यांना बरीचशी माहिती असे. काही अडचणींमुळे रुग्ण किंवा नातेवाईक यांना उपवास घडू नये यासाठी हे दांपत्य काळजी घेत. दोघांनी जणू अविरत रुग्णसेवा करायचे व्रत घेतले होते.

आरोग्यविषयक अभ्यास व व्यवसाय याशिवाय डॉक्टरांना अनेक इतर गोष्टींतही रस आहे. मनुष्य स्वभावाबद्दल त्यांनी मला सांगितले : –

He wants it HOT when it is COLD. He wants it COLD when it is HOT. Always wanting what is NOT.

मनुष्यस्वभाव व त्याचे मन कसे असते याचे यथार्थ वर्णन हे असावे. या

चंचल स्वभावामुळे माणसाला आपल्या व्यवसायापेक्षा दुसरा व्यवसाय केला तर बरे असे वाटते. डॉक्टरांना या कटकटीच्या व्यवसायात व जोखमीच्या कामामुळे कित्येक वेळा उदासीनता आली. पण रुग्णसेवा त्यांनी सोडली नाही ती चालू ठेवून इतर अनेक गोष्टीत काम केले आहे.

सुतारकामाची त्यांना आवड आहे. त्यांनी केलेल्या चाळीस वर्षांपूर्वीच्या खुर्च्या, कपाटे, बसण्याची बाके आजही आहेत. अडले तर बांधकाम करण्याची त्यांची तयारी आहे. संडासच्या टाक्या साफ कशा कराव्यात हे त्यांनी प्रत्यक्ष काम करताना लोकांनी पाहिले आहे.

डॉक्टरांना संगीताची आवड आहे. शास्त्रीय संगीताची त्यांना चांगली जाण आहे. डॉक्टराच्या पत्नी सौ. विभावरी या ''संगीतविशारद'' होत्या. त्यांना विशारदपर्यंतच्या अभ्यासात हार्मोनियम व तबला याची ते साथ करीत असत. डॉक्टरांनी स्वतः ''मध्यमापूर्ण'' या गांधर्व महाविद्यालयाच्या परीक्षा दिल्या आहेत. या वयातही सतारीचा नवीन अभ्यास त्यांनी चालू ठेवला आहे.

श्री. आर्यादुर्गा मंदिर; वागदे येथे सुमारे २५ ते ३० वर्षे नवरात्रीमधील रात्रीच्या सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये संगीत मैफलीचे आयोजन त्यांनी केले आहे. वीस वर्षातील नवरात्रीतील कार्यक्रमांमध्ये एकही दिवस न चुकता कार्यक्रम चालू झाल्यापासून संपेपर्यंत डॉक्टर त्याठिकाणी हजर असत. आणि दैवी कृपेने एकवेळ सुद्धा त्यामध्ये अडथळ आला नाही.

या सांस्कृतिक कार्यक्रमात प्रथम ख्याल गायन नंतर सुगम संगीत या क्रमाने मैफल सादर होत असे. त्यात जोधपूर (राजस्थान) येथील श्री. दादासाहेब क्षीरसागर (यांना डागरबंधू राष्ट्रपती पुरस्कार मिळाला होता) श्री. बाळासाहेब क्षीरसागर (यांनी जसरासचा गंडा बांधला होता. ते आकाशवाणी औरंगाबाद व रत्नागिरी आकाशवाणी केंद्राचे कार्यक्रम डायरेक्टर होते). श्री. मुकुंदराव क्षीरसागर (दादासाहेब व बाळासाहेब यांचे शिष्य आकाशवाणी दिल्लीवर यांचे कार्यक्रम होतात). श्री. आप्पासाहेब देशपांडे नूतन गंधर्व आणि अशा बऱ्याच लोकांचा त्यात समावेश होता.

डॉक्टरांना कोकणातील शेतीत विशेषतः आंबा, काजू व भाजीपाला यात फार रस आहे. त्यांच्याजवळ त्या विषयी खूप माहिती व अनुभव आहेत. शेतात हार्डवर्क करण्याची त्यांची उमेद आहे. कोकणातील शेतकऱ्यासाठी एक गवत कापण्याचे साधे अवजार असावे यासाठी गेली २५ वर्षे त्यांचे प्रयत्न चालू आहेत. रानोमाळ उगवणारे गवत, माणसे असूनसुद्धा गवत काढण्याच्या अडचणी – ते न मिळाल्यामुळे गुरांना कमी चारा म्हणून गुरांची कमी पैदास, त्यामुळे गोबर गॅसची कमतरता व त्यामुळे जळणासाठी वृक्षतोड, गवत न काढल्यामुळे क्षुल्लक कारणांवरून रानोमाळ लागणाऱ्या आगी त्यामुळे नवीन वृक्षलागवडीसाठी धोका, त्यामुळे स्वयंपाक घरातील बायकांना धूर आदीकडून होणारा त्रास, आजार हे टाळण्यासाठी असे अवजार करण्याचा त्यांनी प्रयत्न केला, त्यात त्यांना बरेच यश आले, पण यांत्रिक फायदा म्हणावा तसा झाला नाही. पण प्रयत्न चालू आहेत. आज बाजारात मिळणारी गवत कापणीची यंत्रे, इंधन व किमती यामुळे येथील शेतकऱ्याला परवडत नाहीत.

डॉक्टरांची स्मरणशक्ती खूप दांडगी आहे. बऱ्याच मराठी, इंग्रजी कविता त्यांच्या आजही पाठ आहेत. एकपासून तीसपर्यंत पाढे, पावकीपासून औटकी, एकरकी व एकोत्री त्यांची आजही पाठ आहे. वर्ग, वर्गमुळे ते सहज सांगू शकतात. काही इंग्रजी कवितांची भाषांतरे पण त्यांनी केली आहेत. वानगीदाखल, Boat sails on the river & ship sails on sea and the clouds that sail across the sky is prettier far from these

**जहाज नौका जशा विहरती**
**नदी सागरी या**
**नीला काशी मेघही तरंगती**
**मौज तयांची पहा**
**तरू शिखरे ओलांडूनी,**
**इंद्रधनु हे जाई स्वर्गाशी**
**रस्ता सुंदर असा बांधला**
**पृथ्वी स्वर्गाचा.**

कवितेबद्दलची एक आठवण सांगताना डॉक्टर म्हणतात, ''आमच्या मोठ्या काकांचे शिक्षण त्यावेळेचे चौथी किंवा पाचवी झाले असावे. त्यांचे संस्कृत, वैद्यकीय ज्ञान चांगले होते. ते पनवेलहून कोकणात आल्यावर ते आमची, त्यांनी न सोडविलेल्या गणितांची परीक्षा घेत असत व पुस्तकात पाठीमागे दिलेली उत्तरे बरोबर आल्यावर आम्हाला शाबासकी देत असत. एकदा त्यांनी सहज बोलता बोलता 'मधू तू कविता करशील काय?' असे विचारले. कोणत्या विषयावर असे विचारल्यावर – आम्ही दोघे उन्हात उभे होतो. तेव्हा लगेच सूर्याकडे हात करून 'सूर्यावर लिही असे सांगितले' आणि डॉक्टरांनी दहा पंधरा मिनिटातच सूर्यावर कविता केली ती अशी–

**सूर्य**

**प्रकाश देऊनी दिवसभरे**
**तो सागर ओलांडला**
**जीव जंतूंना जीवन देऊनी**
**अस्ताला चालला**
**रूपेरी गोळा तांबूस झाला**
**आकारही बदलला**
**पाहूनी सारे जग आता**
**वाटे कंटाळला ।।१।।**
**प्रकाश देऊनी पृथ्वीवरूनी**
**पाताळा चालला**
**ससेमिरी लोकांची पाहूनी**

खिन्नची अति जाहला
कामे करूनी लोकही थकले
चालू लागले घरी
अंधकारमय जगतामधी या
अंधकारही घरी ।।२।।
रजोगुणाने जग हे सारे
आता रोगावले
तमोगुणाने जग हे सारे
आता अंधारले
जगताचा हा रोग पाहूनी
वैद्य पाठवी 'भगवंत'
परीक्षा त्याने येऊनी केली
ठरला हिवताप
नसे दवा तो त्याच्या ध्यानी
या रोगावरही
कुणी आधुनिक सुचविल
का हो? 'पॅल्युड्रिन' साठी।।३।।

डॉक्टरांना दोन मुली व एक मुलगा आहे. मोठी मुलगी बी.कॉम. झालेली आहे व ती मिरज येथे असते. धाकटी मुलगी बी.एस.सी., संगीत विशारद आहे. तसेच ती संगीत क्लासेसही चालविते. डॉक्टर समीर नवरे या डॉक्टरांच्या मुलाने आर्थोपेडीक डिग्री घेऊन अस्थिव्यंगावर उपचार करणे सुरू केले. त्याच वेळी डॉक्टरांची सून डॉ. अश्विनी नवरे मुंबईच्या के.ई.एम. रूग्णालयात प्रसूतीशास्त्र या विषयात एम.एस. करीत होत्या. एकाएकी फेब्रुवारी २००६ मध्ये डॉ. मधुकर नवरे यांच्या पत्नीचे निधन झाले आणि डॉक्टरांच्या आयुष्यात संकटांची मालिका सुरू झाली. डॉक्टरांच्या पायाला जखम झाली व मधुमेहाचे निदान झाले. त्यामुळे गँगरीन होऊन उजवा पाय गुढघ्याखाली काढून टाकावा लागला. डॉ. समीरने वडिलांवर यशस्वी शस्त्रक्रिया करून जयपूर फुट (कृत्रिम पाय) लावून दिला.

डॉ. समीर नवरे यांनी सुरुवातीच्या काळात उपजिल्हा रुग्णालय कणकवली येथे अस्थिव्यंगाचे रुग्ण तपासण्यास सुरुवात केली. त्यानंतर नोकरी सोडून त्यांनी नवरे हॉस्पिटलमध्ये आवश्यक ते ऑपरेशन थिएटर सुरू करून पुन्हा एकदा नवरे हॉस्पिटल नावारूपाला आणले.

डॉ. समीर नवरे व डॉ. अश्विनी नवरे यांनी हॉस्पिटलमध्ये आल्यानंतर पेशंटना जागेची कमतरता पडू लागली. त्यावेळी जुन्या जागेत नवीन बांधकाम सुरू करून नवीन रुग्णालय उभे करण्याचे ठरविले.

रुग्णांची संख्या वाढती असल्या-मुळे हॉस्पिटल बंद करून नव्या हॉस्पिटलचे बांधकाम करणे शक्य नव्हते. त्यामुळे टप्याटप्प्याने बांधकाम करण्यात आले. १ मे २०१२ रोजी नव्या व सुसज्ज ३० रुग्णांच्या ट्रिटमेंटसाठी सक्षम असणाऱ्या रुग्णालयाची सुरुवात झाली. मुंबईच्या के.ई.एम. चे तज्ज्ञ डॉ. विनिता साळवी व डॉ. पद्मजा साळवी या डॉ. अश्विनी यांच्या गुरूंच्या हस्ते स्त्रीरोग विभागाचे उद्घाटन झाले. पुण्याच्या हर्डीकर हॉस्पिटलमधील डॉ. शरद हर्डीकर या डॉ. समीर नवरे यांच्या गुरूंच्या हस्ते अस्थिरोग विभागाचे उद्घाटन झाले.

आज नवरे हॉस्पिटलमध्ये अद्ययावत उपचार होत आहेत. सी. आर्म, एक्सरे, आधुनिक पद्धतीचे ऑपरेशन थिएटर यामुळे जॉईंट रिप्लेसमेंट, पाठीच्या मणक्यांचे ऑपरेशन, दुर्बिणीतून सांध्याचे ऑपरेशन होत आहेत. फिजिओथेरपी विभाग, ॲडव्हान्स ट्रॉमा सर्जरी विभाग (अपघातग्रस्त लोकांसाठी) सुरू आहे.

डॉ. अश्विनी नवरे यांच्या मते, रुग्णांच्या मागणीनुसार दवाखान्याला सुसज्ज आणि सर्व सुविधायुक्त करणे ही काळाची गरज आहे. माणसांच्या उत्पन्नात वाढ झाल्याने रुग्णांच्या गरजाही खूप वाढल्या आहेत. या नवीन हॉस्पिटलच्या निमित्ताने या गरजा पूर्ण करत रुग्णसेवा करणे त्यांचे ध्येय आहे. आता स्त्रीरोग उपचार विभागात सध्या कलर डॉप्लर मशिन, वंध्यत्व चिकित्सा, मेनोपॉज चिकित्सा, स्त्रियांच्या विविध रोगांवर सर्व प्रकारची ऑपरेशन्स, दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया असा २४ तास प्रसूती विभाग आहे जिल्ह्यात अल्पावधीतच यशस्वी स्त्रीरोग तज्ज्ञ म्हणून नावलौकिक मिळविलेल्या डॉ. अश्विनी नवरे यांनी गर्भपात होणाऱ्या स्त्रियांसाठी विशेष संशोधन केले.

डॉ. मधुकर नवरे यांचा ''कणकवली भूषण'' म्हणून सत्कार करण्यात आला आहे. आज डॉक्टर आपल्या उतारवयात समाधानी आहेत. नातवंडांना पाढे शिकविणे व संस्कृत श्लोक शिकविणे यामध्ये ते रमतात. इतके ''उतुंग व्यक्तिमत्त्व'' इतक्या साध्या वेशात आपल्यापुढे उभे पाहून आपण नतमस्तक होतो.

आमच्या शाळेतील श्री. साखळकर गुरुजी अभ्यासाव्यतिरिक्त सुभाषिते देत असत. त्यांना समश्लोकी भाषांतरे करण्याची आवड होती. – जसे गीतेचे 'गीताई' – श्री. विनोबा भावे यांनी केले.

''क्षण : कणश्चैव विद्यामथंच साधयेत । क्षणत्यागे कुतो विद्या कण त्यागे कुतोधनम्''

''क्षणाक्षणांनी जोडावी विद्या संपत्ती सर्वदा । क्षण जाता कशी विद्या कण जाता कसे धन?''

मला वाटते डॉक्टर मधुकर नवरे यांनी या सुभाषिताप्रमाणे जास्तीत जास्त जगण्याचा प्रयत्न केला आहे.

दुर्दैवाने डॉ. नवरे सरांचे अनपेक्षितपणे दिनांक १६ मे २०१७ रोजी कणकवली येथे निधन झाले. त्यावेळी मी मुंबईत असल्यामुळे त्यांचे अंत्यदर्शन मला घेता आले नाही, याचे मनस्वी दुःख होत आहे.

**श्री. हणमंत शंकर रायकर**
समर्थनगर, राजापूर, जि. रत्नागिरी
मो. ९८२१२ १६६६४

# तो आणि ते

प्रत्यक्ष असा, तो, मला अवचित भेटला. ध्यानीमनी नसताना, वास्तवात कधी भेटेल याची कल्पना नसताना. एरव्ही भेटायचा तो, कधी स्वप्नात, कधी विचारात हरवलेल्या अवस्थेत असताना, पण प्रत्यक्षात असा भेटेल असं वाटलंही नव्हतं. आपादमस्तक न्याहाळला त्याला. आणि धक्काच बसला.

उजव्या डाव्या बाजूला खोल भळभळत्या जखमा, मस्तकावर पण केस ओरबाडून काढल्याच्या जखमा, संपूर्ण शरीरावर दाह होत असल्याच्या वेदना चेहराभर पसरलेल्या. मला आठवलं, स्वप्नात वा अन्यत्र होणारं त्याचं दर्शन असंच होत होतं. 'काय झालं ? कुणी केलं?' मी पुढं होऊन विचारलं. त्याची मान खाली गेली आणि तो म्हणाला, ते दिसताहेत का तुला ? त्यानं बोटानं सर्व शरीर दाखवलं. ते बघ सगळे, टपून बसलेत सगळे माझ्या शरीराचे लचके तोडायला. गेली सत्तर वर्षे त्यांचे प्रयत्न चाललेत. आणि आत्ता तर यावर्षी अगदी निकराचे प्रयत्न चालू केलेत, एकाच वेळी, सगळ्यांनी. स्वातंत्र्य मिळालं तेव्हा वर्मी घाव घालून उजव्या डाव्या बाजूचे लचके तोडलेत, स्वातंत्र्यानंतर डोक्यावर, मानेवर जखमा करून माझ्या शरीरावरचं मांस ओरबाडलंय बाहेरच्या लांडग्यांनी आणि त्यांना मदत केली माझ्या आधारानं जगणाऱ्यांनी.

हे कमी की काय म्हणून आता प्रादेशिक अस्मितेच्या नावाखाली, जातीजमातीच्या भल्याच्या नावाखाली, शरीराची अन्न रसद तोडून मला भुके मारून इप्सित साध्य करण्यासाठी ते कोणत्याही थराला पोहोचलेत. त्यांना आवरा रे कुणीतरी. नाहीतर माझ्या सगळ्या देहाचे तुकडे तुकडे केव्हा होतील हे तुम्हालाही कळायचं नाही. मी, माझ्यापुरतं, मला काय त्याचं, असं म्हणत बसू नका, नाहीतर मी संपलोच म्हणून समजा. माझ्या नावानं गळे काढण्याऐवजी, नक्राश्रू ढाळण्याऐवजी, आणि खोटी, ढोंगी, दिखाऊ अशी माझी भक्ती करण्याऐवजी काहीतरी असं करा रे की ज्यामुळं माझं शरीर भक्कम होईल, सुदृढ होईल आणि माझं तुमचं नातं अलौकिक होऊन जाईल. कराल एवढं? माझ्या जुन्या जखमा भरून काढाल ? नव्यानं होणाऱ्या जखमा थांबवाल? धर्म, जात, वर्ण, शिक्षण, संपत्तीच्या नादानं बहकणाऱ्या सर्वांना माणुसकीची ओळख करून द्याल ? तो म्हणाला आणि मी भांबावून गेलो. काय उत्तर द्यावं ते कळेना.

मी सर्वत्र पाहिलं. ते माझ्याकडे बघून खदाखदा हसत होते, शरीराचे हाल हाल करत होते. तो माझ्याकडे केविलवाण्या नजरेनं पाहत होता, आणि मी त्याला काय उत्तर द्यावं या विचारानं मान खाली घालून उभा होतो. त्याच्या प्रश्नांना तुम्ही तरी द्याल का उत्तर? तो वाट बघतोय. कारण ते माजत चालले आहेत!

**डॉ.श्रीकृष्ण जोशी, रत्नागिरी**
मो. ९४२३८७५८०६

## जे पुजिती अस्तमानी....

नवऱ्याने नवे कपडे घातले अन् बायको समोर येऊन उभा राहिला आणि म्हणाला – मी कसा दिसतो ते सांग.

बायको म्हणाली –

**मेघनादरिपु तात**
**वधी ज्या नराला ।**
**ते नाम आहे**
**द्वादशमहातील पाचव्याला।**
**त्याची संहिता**
**जे पूजिती अस्तमानी।**
**तैसे तुम्ही दिसता**
**मजला मनी।**

नवऱ्याला याचा अर्थ काही कळेना म्हणून त्यांने एका विद्वान पंडिताला विचारलं तर त्यांनी सांगितलेला अर्थ खाली देत आहे.

मेघनाद म्हणजे इंद्रजित, त्याचा अरि म्हणजे शत्रू. कोण? तर लक्ष्मण (कारण लक्ष्मणाने इंद्रजिताला ठार केले होते) अशा लक्ष्मणाचा तात म्हणजे पिता कोण? तर दशरथ.

दशरथाच्या हातून अजाणता कोण मारला गेला? तर श्रावणबाळ (मराठी बारा महिन्यांतील क्रमांक पाचवा महिना आहे श्रावण) श्रावण महिन्याच्या अमावास्येला (संहिता म्हणजे अमावास्या) कोणता सण असतो ? तर पोळा. पोळ्याला कोणाची पूजा करतात? तर बैलाची. (त्या दिवशी बैलाला सजवतात) त्या सजवलेल्या बैलासारखे तुम्ही दिसत आहात. आता बोला !!

श्री. गणेश गुर्जर, पुणे
मो. ९८९०९ ९०११३

* कऱ्हाडे ब्राह्मण महासंघास हार्दिक शुभेच्छा! *

# विड्याचे पान – शास्त्रोक्त व वैज्ञानिक महती..!!
**(Betel Leaf)**

बारीक नाजूक छान दिसणारा वेल. पाने गुळगुळीत, चमकदार, लांब देठची, हृदयाच्या आकाराची एक टोक असणारी. एका आड एक पाने येतात. पेराला मुळे फुटतात. हा वेल पुढे वाढत जातो.

**विड्याच्या पानाच्या उत्पत्तीची कथा–**

समुद्रमंथनातून अमृत निघाल्यावर भगवान विष्णूंनी मोहिनी रूप धारण करून अमृताचे वाटप केले. तरी थोडे अमृत शिल्लक राहिले. मोहिनीने उरलेले अमृत जवळच उभ्या असलेल्या नागराज नावांच्या हत्तींच्या खुंटाजवळ नेऊन ठेवले. थोड्या दिवसांनी त्या अमृतामधून वेल उगवली. नागाप्रमाणे खुंटावरून सरसर चढत जवळच्या मंडपावर पसरली. हिरवीगार पाने असलेली वेल पाहून देवांना आनंद झाला व तिला नागवेल असे म्हटले. भोजन झाल्यावर देवदेवता पानाचा विडा आवडीने खाऊ लागले. देवाला महानैवेद्य अर्पण केल्यावर देवापुढे पानाचा विडा, दक्षिणा ठेवण्यात येऊ लागला.

१)खाण्यासाठी जी पाने पिकलेली मधूर स्वादाची लहान पातळ असतात ती उत्तम औषधी गुणधर्म. रुची वाढवणारे, कांतिदायक, कफनाशक, सारक, शक्तिवर्धक, वायूनाशक, पोटसाफ ठेवणारे, पाचक, पित्तकारक, शरीरशुध्दी करणारे.

सर्वसामान्य उपाय :- सारखे नाक गळत असल्यास पानाचा एक चमचा रस घेऊन थोडा कोमट करुन मधाबरोबर खाल्ल्यास बरे वाटते. २) सारखा कफ पडतो व छाती भरलेली असते अशा वेळी विड्याच्या पानांचा रस व अडूळसा रस असे मधामधून घेतले तर उतार पडतो. ३) गोडाधोडाचे जेवण झाल्यावर विडा खाल्ल्यास पचन व्यवस्थित होते. ४) नियमितपणे साधा घरगुती विडा खाण्यास ठेवला तर शौचास साफ होते. ५) विड्याची पाने वाटून जखमेवर पोटीस लावले तर दोन दिवसांत जखम भरते.

६) पान खाल्ल्याने तोंडाची अरुची चिकटपणा व दुर्गंधी जाते. पानात असणारा तिखटपणा जंतुनाशक असतो. त्यामुळे पान नुसते चावून खाल्ले तरी दात व तोंडासाठी ते उत्तम असते. शिवाय असे करणे दातकिडिला प्रतिबंध करते. ७) पानात चुना, कात घातल्यास ते त्रिदोषाहारक होते. मन प्रसन्न करते. ८) लहान मुलांच्या पोटफुगीवर नागवेलीच्या पानाचा रस व मध यांचे मिश्रण चाटवले तर मुलांचे अपचन दूर होते. ९) पानातील कॅल्शिअम शरीरामध्ये सहजतेने शोषले जात असल्याने विड्याचे पान जरूर खावे.

**विड्याची पाने आणि त्याचं शास्त्रोक्त महत्त्व :**

१) या विड्याच्या पानाच्या टोकास लक्ष्मीचा वास असतो. २) विड्याच्या पानाच्या उजव्या बाजूस ब्रह्मदेवांचा वास असतो. ३) या विड्याच्या पानाच्या मधोमध सरस्वतीदेवीचा वास असतो. ४) विड्याच्या पानाच्या डाव्या बाजूस पार्वतीदेवीचा वास असतो. ५) या विड्याच्या पानाच्या लहान देठामधे महाविष्णूचा वास असतो. ६) विड्याच्या पानाच्या मागील बाजूस चंद्रदेवतेचा वास असतो. ७) या विड्याच्या पानाच्या सर्व कोपऱ्यामधे परमेश्वराचा वास असतो. ८) विड्याच्या पानाखाली मृत्युदेवतेचा वास असतो. (या कारणाने ताम्बूलसेवन करताना बुडाचा भाग काढून मग सेवन करण्याची पद्धत.) ९) विड्याच्या पानाच्या देठात अहंकार देवता आणि दारिद्र्य लक्ष्मी राहतात. (म्हणूनच पान सेवन करताना देठ काढून देतात. अहंकार आणि दारिद्र्य लक्ष्मी येऊ नये याअर्थी..) १०) विड्याच्या पानात मध्यभागा नंतर मन्मथाचा वास असतो.

यासर्व देवतांचा विड्याच्या पानामधे वास असल्यामुळे ताम्बूलास इतके महत्त्व आहे. पूर्व किंवा उत्तर दिशेस पानाचे टोक येईल असे ठेवून देवास नैवेद्य दाखवावा. कोणाकडेही तांबूल दिल्यास ते देवापुढे ठेवून नमस्कार करून मगच तो उपभोगावा.

मंगळवारी, शुक्रवारी कोणत्याही कारणे विड्याच्या पाने घराबाहेर जाऊ देऊ नयेत. हिरवीगार आणि मस्त हस्ताकार असलेली कोवळी पाने नैवेद्यास ठेवावीत आणि तांबूल म्हणून द्यावीत.

**– श्रीनंद जोशी**

# पसायदान...मनाला थक्क करणारी निस्पृह विश्वप्रार्थना

ज्यांच्या नावातच ज्ञान आणि ईश्वर वसलेला आहे असे संत ज्ञानेश्वर. ज्यांना सर्व भागवत भक्त माऊली ही प्रेममय हाक देतात. आपल्या नावाचा अर्थ आपल्या जीवनातून दाखवून देणारा हा अवलीया. माऊली तुम्हाला शिरसाष्टांग नमस्कार.

माऊलींनी ज्ञानेश्वरीची सुरुवात ईश्वराच्या आद्य रूपास आणि वेदांच्या निर्मात्यास स्मरून केली. ओम नमोजी आद्या.. वेद प्रतिपाद्या...जय जय श्री संवेद्या.. तसेच ज्ञानेश्वरीच्या शेवटच्या – (ओवी १७९४ ते १८०२)– १८ व्या अध्यायाचे समापन 'पसायदान' या अनन्यसाधारण प्रार्थनेने केले आहे.

खरंच आयुष्यात इतके मोठे कार्य करून ज्ञानेश्वरांनी आद्य ईश्वराकडे स्वतःसाठी काही मागितलेच नाही. आपण आता या विश्वप्रार्थनेचा अर्थ पाहू...

**आतां विश्वात्मकें देवें ।**
**येणें वाग्यज्ञें तोषावें ।**
**तोषोनि मज द्यावे ।**
**पसायदान हें ॥ १ ॥**

– या विश्वात्मक (विश्वाच्या कणा कणांमध्ये भरून राहिलेल्या ) माझ्या भगवंता, माझ्या वाणीचा यज्ञ तुझ्या कृपेमुळे अखंड चालू आहे. त्या यज्ञाला आपण प्रसन्न व्हावे आणि मला हे प्रसादाचे दान दयावे.

**जे खळांची व्यंकटी सांडो ।**
**तया सत्कर्मी रती वाढो ।**
**भूतां परस्परे पडो ।**
**मैत्र जीवांचे ॥ २ ॥**

– मग ऐक माझे मागणे. या जगामध्ये जे काही वाईट प्रवृत्तीचे लोक आहेत त्यांच्या दुष्प्रवृत्तींचा नाश कर. कारण कुठलाही मनुष्य हा कधी वाईट



नसतो त्याचे गुण वाईट असू शकतात. तू फक्त तेच काढून टाक आणि दुष्प्रवृत्ती काढून टाकल्यावर त्यांच्या सत्कर्मामध्ये वाढ कर. हे जर केलेस तर नक्कीच या पृथ्वीतलावरील सर्व जीव प्रेममय होऊन जातील.

– भगवंताकडे मागणे मागताना माऊलींना आपल्या वाईट म्हणवल्या जाणाऱ्या मुलाची जास्त काळजी वाटते. कारण प्रत्येक मनुष्य सत्प्रवृत्तीमधून देवत्वाकडे वाटचाल सहज करू शकतो हा त्यांना विश्वास आहे.

**दुरितांचे तिमिर जावो ।**
**विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।**
**जो जे वांच्छिल तो तें लाहो ।**
**प्राणिजात ॥ ३ ॥**

– जगामध्ये पाप हे फक्त अज्ञानरूपी अंधारामुळे आहे. हा अंधार नाहीसा होण्यासाठी जगात स्वधर्मरुपी सूर्याचा उदय होवो. प्राणिमात्रांच्या मंगल इच्छा पूर्ण होवोत.

– इथे विश्व स्वधर्म म्हणजे हिंदू, मुस्लीम, बौद्ध इत्यादी धर्म नव्हेत तर माणुसकी हा धर्म प्रतीत आहे. हा धर्म जर आचरणात आणला तर प्राणिमात्रास इच्छेप्रमाणे सर्व काही मिळेल.

**वर्षत सकळमंगळी ।**
**ईश्वर निष्ठांची मांदियाळी ।**
**अनवरत भूमंडळीं ।**
**भेटतु या भूतां ॥ ४ ॥**

– या विश्वामध्ये ईश्वरनिष्ठ लोकांची सदैव उत्पत्ती होत राहो. सध्या नश्वर गोष्टींवर निष्ठा असणारी प्रवृत्ती वाढत आहे. धन संपत्तीलाच सुख मानणारे लोक नकोत तर आत्म्याचे चिरंतन सुख मागणारे लोक जन्मास यावेत.

**चला कल्पतरुंचे आरव ।**
**चेतना चिंतामणीचें गांव ।**
**बोलते जे अर्णव ।**
**पीयूषाचे ॥ ५ ॥**

–ईश्वरनिष्ठ लोक म्हणजेच संत हे कल्पतरूंचे उद्यान आहेत, चेतानारूपी चिंतामणी रुपी गाव आहेत, त्यांची वाणी म्हणजे जणू अमृताचे समुद्रच आहेत. कल्पतरू किंवा चिंतामणी म्हणजे जे मन इच्छील त्याची पूर्तता करणाऱ्या गोष्टी. जर ईश्वरनिष्ठ लोकांशी संग ठेवला तर आपल्याला काहीच कमी पडणार नाही असा या ओवीचा मतितार्थ.

– माऊलींच्या काव्यामध्ये उपमात्मक दृष्टांत सदैव खूप सुंदर असतात. संतांना इतकी सूचक उपमा देऊन त्यांच्या कार्याचा अभिव्यक्त गौरवच केला आहे.

**चंद्रमे जे अलांछन ।**
**मार्तंड जे तापहीन ।**
**ते सर्वांही सदा सज्जन ।**
**सोयरे होतु ॥ ६ ॥**

– जो मनुष्य, चारित्र्यावर कोणताही डाग नसलेला चंद्रच आहे (अंधारामध्ये सुद्धा दुसऱ्याला साथ देणारा) आणि रागीट स्वभाव नसणारा ज्ञानरूपी प्रकाशाचा सूर्यच आहे. त्याला सदैव सज्जन लोकांचाच संग मिळतो व त्याचे सोयरेही अगदी त्यांच्यासारखेच होतात.

**किंबहुना सर्वसुखीं ।**
**पूर्ण होऊनि तिहीं लोकीं ।**
**भजिजो आदिपुरुखीं ।**
**अखंडित ॥ ७ ॥**

– विश्वामध्ये (तिन्ही लोकातील) लोक सर्वसुखी होऊन अखंड या आदिपुरुषाची भक्ती करत राहोत. तसे पाहता सर्व सुख मिळाल्यानंतर भगवंत भक्तीकडे जाण्याची लोकांची इच्छा कमी होत जाते. आणि ते न होण्याची मागणी माऊली करतात.

**आणि ग्रंथोपजीविये ।**
**विशेषीं लोकीं इयें ।**
**दृष्टादृष्ट विजयें हो ।**
**आवें जी ॥ ८ ॥**

– आद्य भगवंताने जे वेद आणि ग्रंथांची निर्मिती केली आहे, त्या ग्रंथांचा अभ्यास हेच लोकांच्या जीवनाचे लक्ष्य व्हावे. आणि त्याच ग्रंथांमध्ये दिलेल्या मार्गदर्शनानुसार आयुष्य व्यतीत करावे.

– जीवन सुखी करणे हे काही Rocket Science नाही. जीवनातील कठीण प्रसंगावरचा उपाय हा नेहमीच मार्गदर्शक ग्रंथ आणि वेगवेगळ्या पुस्तकांमधून आपल्याला भेटतो. ग्रंथांना जीवन माना आणि जीवनच बदलून टाका.

**येथ म्हणे श्रीविश्वेश्वरावो।**
**हा होईल दानपसावो ।**
**येणे वरें ज्ञानदेवो ।**
**सुखिया झाला ॥ ९ ॥**

– हे विश्वेशराया... हे जगाच्या मायबाप बापा... तू जेव्हा म्हणशील ना की हे दान दिले.....तेव्हाच हा ज्ञानदेव चिरंतन सुखी होईल...

तर असा आहे या विश्व प्रार्थनेचा गुढार्थ... ज्ञानेश्वरांनी लिहिलेल्या ९००० ओव्यांचे हे सार आहे... एका आदर्श समाजव्यवस्थेचे स्वप्न या जगद्माऊलीने ८०० वर्षापूर्वी पाहिले. आजतागायत अखंड आषाढी वारी सुरु आहे, लाखो लोक या भक्तिसागरात बुडून सदैव आळंदी ते पंढरपूर हा भक्तीचा सेतू बांधत आहे. ते करता करता आपण आजच्या सगळ्यात जलद माध्यमाचा म्हणजेच Internet चा वापर सत्कार्यासाठी करूया.

**– आनंद करकरे**

# पंचतंत्र

## क्षुल्लक मानू नये कुणाला, प्रसंगी महत्त्व प्रत्येकाला

एका गावात 'ब्रह्मदत्त' नावाचा एक ब्राह्मण तरुण राहात होता. एकदा तो बाहेरगावी जायला निघाला असता, त्याची आई त्याला म्हणाली, 'बाळा, तू असा एकटा प्रवास करू नकोस. प्रवासात नेहमी कुणालातरी सोबतीला घ्यावे.' 'पण आई, मी जाणार असलेल्या मार्गावर कुणाचेच भय नसल्याने, मला कुणाच्याही सोबतीची गरज नाही.' असे ब्रह्मदत्त म्हणाला असतानाही, त्याच्या आईने परसदारी असलेल्या विहिरीतून एक खेकडा आणला आणि एका कापडाच्या तुकड्यात कापरांच्या वड्यांसह तो घालून व कापडाची पुरचुंडी करून, तिने तो खेकडा सोबतीसाठी त्याच्या स्वाधीन केला.

बाहेरगावची वाट चालता चालता उन्हे उभी राहिल्याने तो तरुण वाटेत लागलेल्या एका छायाळ वृक्षाखाली विश्रांतीसाठी म्हणून आडवा झाला आणि पडल्या पडल्या त्याचा डोळा लागला. तेवढ्यात एका वृक्षाच्या ढोलीतून एक जहरी नाग बाहेर पडला व त्या तरुणापाशी गेला. पण त्याच्याजवळच असलेल्या त्या पुरचुंडीतून कापराचा वास बाहेर पडू लागल्याने व सापाला कापूर प्रिय असलयाने, तो आपल्या अणकुचीदार दातांनी ती पुरचुंडी उलगडू लागला. ती तशी उलगडली जाताच, तिच्यातून बाहेर पडलेल्या खेकड्याने आपल्या नांग्यांच्या कैचीत त्या नागाची मानगूट आवळून त्याला ठार केले. जाग आल्यावर जेव्हा त्या तरुणाच्या दृष्टीस – आपण झोपेत असताना घडलेला प्रकार कळला, तेव्हा तो स्वतःशीच म्हणाला, 'आई म्हणाली तेच खरे. या जगात कुठलीच गोष्ट क्षुल्लक नसते. प्रसंग येताच तिचे महत्त्व पटते'. मग आपल्या आईच्या धोरणी वृत्तीचे मनात कौतुक करीत तो तरुण पुढल्या वाटेला लागला.

अशा या मनोरंजक पण बोधप्रद गोष्टी तीन राजकुमारांना सांगून 'पंचतंत्रा'च्या तंत्राची समाप्ती करताना विष्णुशर्माने त्यांना मुद्दामच विचारले, 'बाळांनो, या गोष्टी ऐकण्यात तुमचा वेळ चांगला गेला ना?' यावर ते राजकुमार नम्रपणे अभिवादन करून म्हणाले, 'गुरुदेव, आयुष्याचा मौल्यवान वेळ नुसत्याच मनोरंजनात घालविणे, हे निष्क्रियतेचे व सामान्य बुद्धी असल्याचे लक्षण आहे. आयुष्याचा क्षण अन् क्षण सत्कारणी लावला पाहिजे. या मनोरंजक पण बोधप्रद गोष्टींतून आपण आम्हाला या जगाकडे पाहण्याची व या जगात वागण्याची एक नवी दृष्टी दिलीत. आपण दिलेली ही 'शिदोरी' घेऊन, आम्ही आयुष्याची पुढली वाटचाल यशस्वीपणे करू. फक्त आपले आशीर्वाद आम्हाला द्या.'

विष्णुशर्मा हात उंचावून म्हणाला, 'तथास्तु !'

मंदिरांचे अंतरंग


# मीनाक्षी अन्नम मंदिराचा इतिहास

मीनाक्षी अन्नम मंदिर हे एक ऐतिहासिक हिंदू मंदिर आहे. जे भारतातील तामिळनाडू राज्यातील मदुराई शहरात वाहणाऱ्या वैगाई नदीच्या किनाऱ्यावर स्थापित आहे. हे मंदिर माता पार्वतीला समर्पित आहे. पार्वती मातेस मीनाक्षी असेही म्हटले जाते. शिवांना सुन्दरेश्वर नावाने ओळखले जाते. हे मंदिर २५०० वर्षे जुने असून मदुराई शहराचे ह्रदय मानले जाते. हे तामिळनाडू येथील सर्वात महत्त्वाचे आकर्षण मानले जाते.

असे म्हटले जाते की ह्या मंदिराची स्थापना व निर्माण स्वयं इंद्रदेवाने केली. आपल्या कर्माचे फळ भोगण्यासाठी ते तीर्थयात्रेस निघाले तेव्हा भगवान शिव आणि पार्वती यांनी त्यांना मार्गदर्शन केले. तेव्हा या स्थानावर इंद्रदेवांनी एक पवित्र मंदिराची स्थापना केली. येथे दर्शन दिल्यावर भगवान शिव व देवी पार्वती एका शिवलिंगमध्ये विलीन झाले. ह्या लिंगाची स्थापना स्वयं इंद्रदेवाने केली अशी मान्यता आहे. इंद्रदेव नित्यनेमाने लिंगाची पूजा अर्चना करायचे. इंद्रदेव कमलपुष्प अर्पित करून शिव पार्वतीस प्रसन्न करायचे.

सेवा दर्शनशास्त्राचे प्रसिद्ध हिंदू संत धीरुग्नानसम्बदर यांनी या मंदिराचे वर्णन ७ व्या शतकाआधीच केले होते. १५६० मध्ये राजा विश्वनाथ नायक यांनी मंदिरातील अनेक वास्तूंची निर्मिती केली होती. त्यामध्ये वसंत मंडपम, किलीकुंदू मंडपम आणि मीनाक्षी नायकर मंडपम यांचा समावेश आहे.

प्राचीन पांडियन राजा या मंदिराच्या देखरेख व दुरुस्तीसाठी जनतेकडून कर वसुली करत असे. लोक



त्यावेळी सोने व चांदीमध्ये आपला कर चुकवत. लोकांच्या घरी स्वतः राजा वर्षातून एकदा जाऊन तांदळाची भिक्षा मागायचे व जमा धान्य मंदिरास दिले जाई. लोक भावनिक दृष्ट्या ह्या मंदिराशी जुळलेले होते.

या मंदिराच्या वर्तमान स्वरूपास इ.स.१६२३-२५ च्या आसपास बनविले गेले होते. मूळ मंदिराची दुरुस्ती ६ व्या शतकात कुमारी कदम राणीच्या पुत्रांद्वारा केली होती. १४ व्या शतकात याची मुघलांनी लूटमार केली होती. मंदिरातील मौल्यवान रत्न व दागिने सोबत घेऊन गेले.

१६ व्या शतकाच्या शेवटी विश्वनाथ नायक द्वारा या मंदिरास पुनर्निर्मित केले गेले. हे मंदिर शिल्प-शास्त्रानुसारच बनविले गेले. त्यामुळे भारतातील कलात्मकदृष्ट्या याचे शिल्प सर्वोत्तम मानले जाते. या मंदिराला असलेली सर्व १४ प्रवेशद्वारे; ४५-५० मीटर उंचीची आहेत. याचा सर्वात उंच स्तंभ ५१.९ मीटर उंच आहे. मंदिर बाहेरून फारच सुंदर व कलात्मक आहे.

**मीनाक्षी अन्नम मंदिरातील उत्सव**

मंदिराशी जुळलेला एक महत्त्वाचा उत्सव येथे साजरा होतो. त्यास मीनाक्षी थिरूकल्याणम (मीनाक्षीचा दिव्य सोहळा) असे म्हणतात.

स्थानिक लोक प्रत्येक वर्षी एप्रिल महिन्यात ह्या परम दिव्य जोडप्यास सजवून, त्याचे रीतीप्रमाणे व विधिवत लग्न लावतात. ह्या विवाह प्रथेस लोक आपला विवाह करताना अंगिकारतात. ही प्रथा मदुराई विवाह प्रथा म्हणून ओळखली जाते. पुरुषप्रधान विवाह प्रथेस चिदंबरम विवाह प्रथा असे

....पुढील पानावर

....मागील पानावरून

## मीनाक्षी अन्नम मंदिराचा इतिहास

म्हणतात. हा शिव-पार्वतीचा विवाह सोहळा पाहण्यास शैव आणि वैष्णव दोन्ही पंथाचे लोक उत्साहाने येतात.

काल्पनिक कथेनुसार या विवाहात देव, देवी, मनुष्य, पाताळवासी व स्वर्गवासी लोक हजर होते. हा पर्वकाळ एक महिना चालतो. मोठ्या आनंदाने लोक हा उत्सव साजरा करतात. पौराणिक मान्यतेनुसार भगवान शिव अत्यंत सुंदर रुपात देवी मीनाक्षीशी विवाह करण्याच्या हेतूने पृथ्वीवर आले होते. देवी मीनाक्षीने मदुराई राजाच्या पुत्रीच्या रुपात अवतार घेतला होता. देवी मीनाक्षीने शिवांचा पती म्हणून स्वीकार केला होता. घोर तपस्या केली होती. प्रसन्न होऊन शिवांनी देवी मीनाक्षीसोबत विधिवत लग्न केले.

दर दिवशी २०००० हून अधिक लोक या मंदिरास भेट देतात. विशेषतः शुक्रवारी ३०००० पर्यंत लोक दर्शनासाठी येतात.

वर्षातील महाशिवरात्री येथील लोक मोठ्या आनंदाने साजरी करतात. या मंदिरात एकूण ३३००० मूर्ती आहेत. 'न्यू सेवन वंडर्स ऑफ द वर्ल्ड' मध्ये या मंदिराचा समावेश आहे.

भारतातील प्रमुख ३० प्रेक्षणीय ठिकाणांपैकी एक महत्त्वाचे पर्यटनस्थळ म्हणून या मंदिराची ख्याती आहे. दरवर्षी एप्रिल व मे महिन्यातील मीनाक्षी थिरुकल्याणम महोत्सवात लोक दूरवरून येतात. यावेळी येथे प्रतिदिन १ लाखापेक्षा जास्त लोक दर्शनास येतात.

हे मंदिर भारतातील सर्वात सुंदर व पारंपारिक उत्सवाचे प्रतीक मानले जाते.

– संकलन : श्री. वा. गुर्जर

## बस कंडक्टर

मुंबईतला बस कंडक्टर
बिचारा सतत उभा ड्युटीवर
नोकरी आहे त्याची खडतर
कवितेतच पाहू सविस्तर ।।१।।

वेळेआधी कामावर हजर
चिल्लर थोडी घेतो बरोबर
कुणी पाचशेची नोट दिली तर
भांडण्यापेक्षा हेच सोईस्कर
मुंबईतला बस कंडक्टर
विचारात, वेळेत किती तत्पर ।।२।।

बसची जबाबदारी त्याच्यावर
बस चालते त्याच्या घंटीवर
तिकीट बॉक्स एका खांद्यावर
पैशाची पिशवी दुसऱ्यावर
मुंबईतला बस कंडक्टर
कांदाभजी खातो-पिशव्या बरोबर।।३।।


अंकुश त्याचे ड्रायव्हरवर
बस थांबते त्याच्या बेलवर
लक्ष त्याचे प्रत्येक स्टॉपवर
चढत्या-उतरत्या प्रवाशांवर
मुंबईतला बस कंडक्टर
पहारेदार तो जागेवर ।।४।।

हिंदी, मराठी भाषेवर मदार
बस स्टॉप येताच त्याची पुकार
स्टेशन, कॉलेज, मार्केट, आगार
पुढे सरका, आगे चलो चा भडिमार
मुंबईतला बस कंडक्टर
''संपर्क अधिकारी''तो जागेवर ।।५।।

बसचा तो मोबाईल कॅशियर
कधी जवळ भरपूर चिल्लर
तर कधी 'सुटे द्या' चा गजर
रोजचा हिशोब देतो डेपोवर
मुंबईतला बस कंडक्टर
किती भूमिका करतो जागेवर ।।६।।

आपण उभा-प्रवासी सीटवर
ना खुर्चीचा लोभ-कुणाचा मत्सर
ना उणे-दुणे-पैशाचा अपहार
व्हाईटमनीत त्याचा व्यवहार
मुंबईतला बस कंडक्टर
कौतुक गुणांचे हेच सेंटर ।।७।।

**श्री. प्रदीप पु. सातवळेकर**
पाम एकर्स सोसायटी,
मुलुंड (पूर्व), मुंबई -८१.
मो : ९८६९६ ८३३३५.



*** कऱ्हाडे ब्राह्मण महासंघास हार्दिक शुभेच्छा! ***
श्री. श्रीगजानन गुर्जर, पुणे
मो. ८८०६३ ९५८८०

# विष्णूसहस्रनामाची उत्पत्ती

पूर्वी एकदा १९४० किंवा ५० च्या दशकात कोणीतरी महा पेरियार कांची धर्माचार्य चंद्रशेखर सरस्वती ह्यांची मुलाखत घेत होते. ते सद्गृहस्थ मुलाखत ध्वनिमुद्रित करीत असताना टेप रेकॉर्डरचा वापर करीत होते तेव्हा पेरियार ह्यांनी प्रश्नार्थक पवित्रा घेत विचारले, कोणाला सर्वात जुन्या टेप रेकॉर्डर विषयी माहिती आहे का ?

ह्या नंतर त्यांनी दुसरा प्रश्न विचारला, विष्णूसहस्रनाम आपल्या पर्यंत कसे आले ?

कोणी तरी म्हणाले, पितामह भीष्म ह्यांच्या मुळे ते आपल्याला प्राप्त होऊ शकले, ह्या वर सर्वांचे एकमत झाले.

त्यावर महा पेरियार ह्यांनी पुढचा प्रश्न केला, युद्ध भूमीवर सगळ्यांनी भीष्म ह्यांना विष्णू सहस्रनाम म्हणताना ऐकले तेव्हा ते कोणी टिपून घेतले ?

पुन्हा एकदा शांतता पसरली.

तेव्हा महा पेरियार ह्यांनी स्पष्ट केले, जेव्हा भीष्म कृष्णस्तुतीपर विष्णूसहस्रनाम म्हणत होते तेव्हा कृष्ण व्यास ह्यांच्या समवेत सर्वजण त्यांच्याकडे पाहत होते. जेव्हा त्यांनी १००० विष्णू नामे म्हणून पूर्ण केली तेव्हा सर्वजण त्यांच्या कडे आश्चर्यचकित होऊन पाहातच राहिले. सर्वात पहिले युधिष्ठिर भानावर येऊन ह्यावर संमिश्र प्रतिक्रिया देते झाले, पितामह ह्यांनी वासुदेवाची उत्कृष्ट अशी रमणीय १००० नावे पठण केली, आपण सर्वजण फक्त ऐकतच राहिलो पण कोणी ती टिपून घेतली नाहीत, आता त्याचा क्रम पण आपण गमावला.

तेव्हा सगळेजण कृष्णाकडे मोठ्या आशेने वळून मदतीची याचना करू लागले, नेहमी प्रमाणे कृष्ण म्हणाला, मलासुद्धा तुम्हा सर्वांप्रमाणे ऐकलेली रचना आवडली पण आपण काय करू शकतो ?

तेव्हा सर्वजण अमूल्य अशा रचनेच्या पुनर्प्राप्तीसाठी कृष्णाची आर्जवं करू लागले तेव्हा वासुदेव उद्गारले, हे फक्त सहदेव पुनर्प्राप्त करू शकेल आणि व्यास ते टिपून घेतील.

सर्वजण, सहदेव हे कार्य कशा प्रकारे करू शकेल? जाणून घेण्यासाठी उत्सुक झाले, तेव्हा कृष्णाने उत्तर दिले, आपल्या सर्वांमध्ये सहदेवाने एकट्याने सूत स्फटिक धारण केले आहे. जर त्याने शिवाची प्रार्थना केली आणि ध्यान केलं तर तो स्फटिकाला ध्वनी लहरींमध्ये रुपांतरित करु शकेल आणि व्यास ते टिपून घेऊ शकतील.

तेव्हा सहदेव आणि व्यास जिथे त्यांनी भीष्म पितामहांना सहस्रनाम म्हणताना ऐकले होते त्याच ठिकाणी खाली बसले.

सहदेवाने स्फटिकाच्या मार्फत ध्वनिलहरींद्वारे सहस्रनाम प्राप्त करण्या-साठी शिवाचे ध्यान आणि प्रार्थनेला सुरुवात केली.

स्फटिकाची प्राकृतिक रचना शांत वातावरणामध्ये ध्वनी हस्तगत करू शकेल अशी असते. जो श्वेतांबर आणि स्फटिकासमान आहे अशा शिवाचे उचित असे ध्यान केल्यास ह्या ध्वनिलहरी पुनर्प्राप्त होऊ शकतात.

अशा प्रकारे विश्वातील सर्वात पहिल्या स्फटिक टेपरेकॉर्डर मार्फत रचना ऐकून व्यासांनी ती टिपून आपल्यापर्यन्त विस्मयकारक असे विष्णूसहस्रनाम पोहोचवले. हे जेव्हा महा पेरियार ह्यांनी स्पष्ट केले तेव्हा सर्वजण स्तंभित होऊन ऐकतच राहिले.

आपण आज वापरतोय त्या हार्ड डिस्क, मेमरी कार्ड मध्ये स्फटिकाचाच वापर होतोय. Quartz stone or $SiO_2$ or silicon म्हणजेच स्फटिक होय.

**– आलोक जोशी**

---

## संस्कृत सुभाषित

आपण व्यवहारामध्ये नेहमी शब्द वापरतो 'लाङ्गूलचालन' पण त्याचा मूळ श्लोक पुढीलप्रमाणे आहे.

**लाङ्गूलचालनमधश्चरणावपातं**
**भूमौ निपत्य वदनोदरदर्शनं च।**
**श्वा पिण्डदस्य कुरुते गजपुङ्गवस्तु**
**धीरं विलोकयति चाटुशतैश्च भुङ्क्ते।।**

–भर्तृहरि नीतिशतक

शेपूट हालविणे, पायांवर लोळण घेणे, भूमीवर पडून तोंड आणि पोट दाखविणे. खायला देणाऱ्यापुढे कुत्रा हे सर्व करतो.

गजेन्द्र म्हणजे अर्थातच हत्ती. मात्र त्याच्याकडे शांतपणे पाहतो आणि शंभर आर्जवे केली म्हणजेच खातो.

# बोलणं – एक कला

'बोलण्याची शक्ती' हे निसर्गाने फक्त मानवालाच दिलेलं वरदान आहे. आपल्या इच्छा, भावना, विचार, गरजा व्यक्त करण्याचे ते एक साधन आहे. तुम्ही बोलायला सुरुवात केली की, तुम्ही कसे आहात याचा परिचय होतो. तुमच्या आवाजाची पट्टी, शब्दांची निवड, बोलण्यातला खरेपणा, प्रामाणिकपणा, समोरच्याबद्दल आदर, आपुलकी सारं काही बोलण्यातून कळतं. आपली नाती, व्यवसाय, सामाजिक व्यवहार या बोलण्यावरच अवलंबून आहेत! हे इतके महत्त्वाचे असूनही आपण ते अधिक चांगले करण्यासाठी प्रयत्न करत नाही.

'आहे हे असं आहे', 'माझा आवाजच मोठा आहे' 'मला अशीच सवय आहे' असं म्हणत आपण स्वतःचं समर्थन करतो.

बोलणं शिकावं लागतं आयुष्यभर. 'कौन बनेगा करोडपती' मी फक्त अमिताभ बच्चन यांचे बोलणे ऐकण्यासाठी पाहिले आहे. शब्दोच्चार, आवाजाचा चढ – उतार शिकायचं असेल, तर हा आवाज अभ्यासायलाच हवा, आवाजाची, बोलण्याची साधना– तपस्या म्हणजे अमिताभ बच्चन! काही शब्द त्यांच्या तोंडून ऐकले, की मग तसा उच्चार दुसरं कोणी करू शकत नाही हे हळूहळू कळत जातं.

शब्द जगलेला माणूस तो शब्द उच्चारतो, त्यावेळेस शब्दांचा उच्चार ज्या ताकदीने येतो त्यावरून त्याचा खरेपणा ओळखता येतो. बोलण्याचा आवाज हा आतून येतो! माणसाच्या चेतनेला स्पर्श करून! त्यामुळे शेवटी माणूस म्हणून आपण जितके घडत जातो, तितका आवाजही सुंदर होत जातो. आशाताईंचं बोलणं गाण्याइतकंच सुश्राव्य आहे. जगण्याची लढाई हसत लढलेल्या शक्तीची ती अभिव्यक्ती आहे. संदीप माहेश्वरींचे शब्द ऐका.. 'आसान है' ... हे शब्द नाहीत, आतून आलेलं सत्य आहे, त्या माणसाचं अनुभवलेलं, जगलेलं.

एक प्रयोग केला होता. सुंदर शब्दांची यादी दररोज वाचणं. प्रामाणिक, सत्य, अद्भुत, शक्ती... अशा सकारात्मक शब्दांची यादी लिहायची आणि वेळ मिळेल, तशी मोठ्याने वाचायची. वाढवत जायचे हे शब्द. हळूहळू आपल्या बोलण्यात ते शब्द येऊ लागतात. बोलणं चांगलं होतंच, पण सवयीने या विरुद्ध काही ऐकावंसं वाटत नाही, इतका अभिरुचीचा दर्जा वाढत जातो! संगत बदलते. आयुष्य बदलून टाकणारी ही शब्दांची साधना आहे. शब्द जसे असतील, तशा घटना, तशा व्यक्ती आपण आकर्षित करत असतो. मग शब्द बदलून आयुष्य बदलता येईल, हेही तितकंच खरं!

सावकाश बोलणं, स्पष्ट बोलणं, शक्यतो हळू बोलणं या सवयी मुद्दाम लावून घ्याव्या लागतात. वाचनाने विचार स्पष्ट, मुद्देसूद होतात. नेमकं मोजकं बोलता येतं. कविता वाचत शब्द समजून घेता घेता बोलण्याची लय सुधारते. बोलण्यातला रुक्षपणा जातो आणि हृदयाशी संवाद साधण्याची कला साध्य होते. यासाठी वाचन, काव्यवाचन महत्त्वाचे ठरते.

आजकाल, इंटरनेटमुळे दर्जेदार भाषणे, कार्यक्रम आपल्याला सहज ऐकता, पाहता येतात, याचा वापर बोलणे सुंदर करण्यासाठी करता येईल. कानात प्राण आणून ऐकावं अशी माणसं या जगात आहेत! फक्त शोधता – ऐकता आली पाहिजेत.

या बोलण्यातली सर्वांत टाळायची गोष्ट, म्हणजे पाल्हाळ लावणे, संथ लयीत, समोरच्या व्यक्तीच्या सहनशक्तीची परीक्षा घेत रटाळ बोलणे. वेळ ही संपत्ती (Time is Money) असेल, तर अशा लोकांना वेळचोर का म्हणू नये?

फोन, मोबाईलवर बोलण्याचे नियम हा तर एक स्वतंत्र विषय होऊ शकेल. आपल्या माणसांशी बोलण्याने ताण हलका होतो.

आजकाल टी.व्ही., इंटरनेटमुळे संवाद कमी कमी होतोय. व्हॉट्सॲप, मेल हीच संवादाची साधनं झालेली आहेत. पण त्यांना चेतनेचा स्पर्श नाही. बोलणं म्हणजे निव्वळ शब्द थोडीच असतात? न बोलता शांत सोबतही बोलणंच असतं. वेळात वेळ काढून घराघरांत संवाद झाले पाहिजेत. माणसांमाणसातले अंतर बोलण्यानेच दूर होऊ शकते. मनातले गैरसमज बोलून दूर करता येतात, पण त्याआधी कसं बोलायचं, ते या जगाच्या शाळेत शिकावंच लागतं.


बाकी हा जगण्याचा प्रवास अवघड आहे. शेजारी कोणी बोलणारं मिळालं, की प्रवास सोपा होतो.

बाकी प्रत्येकाला कधीतरी उतरायचं आहेच!

**– सौजन्य : कांचन दीक्षित**

# तांबे परिवाराला, ग्रीन सोसायटी पर्यावरण-पुरस्कार




कऱ्हाडे ब्राम्हण संघाचे आजीव सभासद असलेले ज्येष्ठ नागरिक श्री.प्रमोद तांबे व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. अनिता तांबे हे उभयतां गेली अनेक वर्षे पर्यावरणपूरक अस छंद जोपासत आहेत. यामध्ये स्वयंपाकघरातील ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून त्यापासून गॅसनिर्मिती, ओल्या व सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया करून त्यांचे खतात रूपांतर करणारा गांडूळ खत प्रकल्प, ओल्या व सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया करून त्यापासून कंपोस्ट खत निर्मिती, सौर कुकर, सौर हिटर, सौर ऊर्जा निर्मिती, रुफ टॉप सोलार सिस्टिम, संपूर्ण घरात एल.ई.डी. दिव्यांचा वापर असे पर्यावरणास पूरक अशा गोष्टी ते उभयता आवडीने करत असतात.

नुकताच त्यांना रोटरी क्लब गांधी भवन कोथरूड यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या ग्रीन सोसायटी पुणे या स्पर्धेत वैयक्तिक कुटुंब या गटातील प्रथम पुरस्कार, सुप्रसिद्ध पर्यावरणतज्ज्ञ मा. माधवराव गाडगीळ यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

कऱ्हाडे ब्राम्हण महासंघातर्फे तांबे परिवाराचे हार्दिक अभिनंदन !

– संपादक


# जी. व्ही. गणपत्ये केमोक्रॅटस् सेल्स्

फायबरग्लास रॉ मटेरिअल,

इपॉक्सी रेझीन्स, पॉलीयुरेथेन रेझीन्स इपॉक्सीपुटीज (एम, सील)

लॅमिनेशन मटेरिअल, प्लायवुड बोर्डस्

मिळण्याचे एकमेव ठिकाण.

जोगेश्वरी मंदिरासमोरील गल्ली, वाघ चेंबर्स, ६४५, बुधवार पेठ, सकाळ ऑफिस जवळ, पुणे – ४११ ००२

ऑफिस (०२०) २४४५२११०, २४४५९८३४ मो. ९८२२० २४२१०

# KARHADA PARISHAD MANGALURU

The ever-jovial Kiran Kumar was nervous on Sunday. And it was understandable. The 28 years old had been to a matrimonial meet with his parents. When the anchor asked what kind of a woman he was looking for, Kiran had a broad blush on his face but went mum.

So was the situation with at least 200 other unmarried people at the Balam Bhatt Hall of Sharavu Sir Radhakrishna Temple, where the Karhada Parishad Mangaluru and Sri Sankara Matrimony organized the first-of-its- kind matrimonial meet exclusively for single Brahmin men and women. Potential brides, grooms and their parents started reaching the venue as early as 8 am.

Kiran Kumar, after mustering some confidence, replied to the anchor that he wanted a girl aged 20-25. As his mother said; her only condition was that her son and daughter-in-law should live happily, Kiran said, "Even if the girl is older to me, I do not mind. Sachin Tendulkar and Lord Rama too were much younger to their spouses."




Naveen (name changed), a 36 year old purohit, was also one of the hopefulls. He reached the venue from Kasargod in Kerala early in the morning and wanted to marry a sportswoman. "I don't mind whether she is employed or not. If not an athlete, she should at least be interested in sports," he said.

According to a few senior people who were present at the venue, the matrimony meet was a boon especially for unmarried purohits and agriculturists. "As today's parents do not plan to have more than two kids, the demand for pundits and farm workers, as grooms is on the wane. This is because with lesser children in the family, the parents can afford to give them high quality education. When such is the case, which young boy or girl will want to work in the farm or depend on the income earned by conducting rituals?" a 72-year-old woman, who did not wish to be named, asked.

There was giant screen at the matrimonial meet and the interview of bride/groom and parents was a closed - door affair. "Generally, people hesitate to talk about marriage and their future spouses in open. Hence, we arranged a closed-door interview, where they would only face the anchor but everyone outside could watch them live. If the thoughts of the interviewee and those seated outside matched, they probably get hitched," the organizer said.

---

**संस्कृत सुभाषित**

**कुसुमं वर्णसंपन्नं गन्धहीनं न शोभते ।**
**न शोभते क्रियाहीनं मधुरं वचनं तथा ।।**

अर्थ : सुगंध नसणारे फूल सुंदर रंगाचे असले तरी शोभून दिसत नाही. त्याचप्रमाणे काम न करता व मदत न करता फक्त गोड बोलणे शोभून दिसत नाही.

# "न मानलेल्या आभाराची गोष्ट"

मनावरचा भार हलका करण्यासाठी शब्दांचा घेतलेला आधार म्हणजे अर्थातच आभार! कार्यक्रमातील शेवटचा अनिवार्य भाग. बैठक व्यवस्था तसेच स्टेज, माईक, भोजन अशा अनेक व्यवस्थांच्या सहभागातील कार्यकर्त्यां-विषयी आभार मानणारी व्यक्ती कृतज्ञतेची भावना व्यक्त करीत असते. तथापि, दिवसभराच्या भरगच्च कार्यक्रमामुळे श्रमलेल्या, थकलेल्या, प्रतिनिधींना, जीवांना, परतीच्या प्रवासाचे, घरचे, वेध लागलेले असतात. त्यामुळे आभाराचे काही शब्द ऐकण्याच्या मन:स्थितीत फारसे कोणीच नसतात. लग्नकार्यात शेवटचे मंगलाष्टक सुरू होताच भोजनकक्षाकडे धाव घेणाऱ्यांची जशी गर्दी उसळते अगदी तसेच.

उपरोक्त विषयावर भाष्य करण्याचे प्रयोजन मोठे मजेशीर आहे. रत्नागिरी कऱ्हाडे ब्राह्मण संघाने, रत्नागिरी येथे स्वतःच्या भव्य वास्तूत महासंघाच्या बैठकीचे आयोजन अतिशय नेटकेपणाने करून उपस्थितांची मने जिंकली. सातारा येथून वेळेत निघूनसुद्धा प्रवासातील अनेक अडथळे पार करीत सभास्थानी पोहोचण्यास आम्हांस थोडा विलंब झाला. कार्यक्रमाची सुरुवात नुकतीच झाली होती. स्थानापन्न होताच हसतमुखाने आम्हाला मोहक रंगाची, आकर्षक कागदी फुले आणि वर्षभर जिभेवर गोडी रेंगाळावी म्हणून रत्नागिरी हापूस आंब्यांच्या रसाची पॅकबंद बाटली देऊन रत्नागिरीकरांनी केलेल्या स्वागताने आम्ही भारावून गेलो. या स्वागतात आम्हाला आपलेपणाचा ओलावा जाणवला. आम्ही सद्‌गतीत झालो.

पहिल्या सत्राच्या समाप्तीनंतर भोजनाची पगंत बसली. कार्यक्रमात भगिनींचा मोठा सहभाग असल्याने पगंत वाढण्याची जबाबदारी बहुदा त्यांनी उचलली असावी. आम्हांला भोजन-समयी कौटुंबिक वातावरणाची अनुभूती आली. आंबरस पुरीचा बेत असल्याने मी आंबरसाचा मनमुराद आस्वाद घेतला. खरं सांगायचे तर आडवा हात मारला. तृप्ततेच्या आनंदानंतर गप्पांची मैफल रंगली असतानाच 'संपर्क' मासिकाचे संपादक श्रीगजानन गुर्जर तेथे आले आणि आमच्या संघाचे अध्यक्ष अनिलराव काटदरे यांना म्हणाले की, 'आभार मानण्याची जबाबदारी' त्यांचे हे वाक्य पूर्ण होण्याचे आतच यशस्वी उद्योजक असा नावलौकिक असणाऱ्या अनिलरावांनी तो चेंडू लीलया माझ्या दिशेने टोलावला आणि आभार प्रदर्शनाची जबाबदारी माझ्यावर येऊन पडली. नावामध्येच ईश्वरी वास्तव असणाऱ्या व माझ्या अप्रकाशित लेखांना प्रसिद्धीचे भाग्य प्राप्त करून देणाऱ्या संपादकांना 'नाही' म्हणणे, म्हणजे स्वतःचे पायावर धोंडा मारून घेण्यासारखे होते. माझी अद्यापि अप्रकाशित मौलिक (?) लेखनसंपदा प्रसिद्धीच्या प्रतीक्षेत आहे याचे मला भान होते. माझ्याकडे 'हो' म्हणण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता.

भोजनोत्तर दुपारच्या सत्राची सुरुवात उत्साहात झाली. अनेक विषयावर साधक-बाधक चर्चा होत होती. महासंघाने बैठक दर तीन का सहा महिन्यांनी घ्यावी यावर मतप्रदर्शन सुरू असतानाच माझ्या मनात विचार आला. की 'मे' महिन्यातील बैठक रत्नागिरी येथेच घ्यावी. कारण आमरस हा माझा विक पॉईंट. कोणीतरी नंतर हेच मत व्यक्त केले आणि त्याला मात्र उपस्थितांची दाद मिळाली. माणसाने मनातले विचार लगेच बोलून दाखविले पाहिजेत याची मला त्यावेळी तीव्रतेने जाणीव झाली. कार्यक्रम शेवटच्या टप्प्यावर आला आहे असे वाटत असतानाच तो लांबत जात होता. आयोजकांनी चार, पाच माईकची व्यवस्था केली असूनदेखील कोणत्याच माईकला उसंत मिळत नव्हती. उपस्थित प्रतिनिधींचा इतका उत्साह, सहभाग बघून माझे मन भरून आले. महासंघाचे भवितव्य निश्चितच उज्ज्वल आहे. तेजोमय आहे असा विचार मनाला स्पर्शून गेला. माझ्या या मतावर मीच शिक्कामोर्तब केले.

आभार प्रदर्शनात महिला आघाडीचे कौतुक करा; त्यांनी ज्या आपलेपणाने सर्वांना वाढले त्यामुळे घरी जेवल्याचा आनंद मिळाला. कार्यकर्त्यांचे आभार माना. स्टेजवर लवकर जा, असा सारखा रेटा माझ्यामागे बसलेले आमच्या संघाचे अध्यक्ष व सेक्रेटरी यांनी लावून धरला होता. आभार मानताना स्टेजवर घशाला कोरड पडू नये म्हणून मी दुपारच्या सत्रापासूनच अधूनमधून पाण्याचा घोट मारत होतो.

एव्हाना बाटलीतील पाण्याने तळ गाठला होता, तथापि, स्टेजचे भाग्य अद्यापि माझ्यापासून दूर होते. आता मात्र आभारासाठी नक्कीच बोलवणार म्हणून मी बाटलीतील पाण्याचा शेवटचा घोट मारून उठण्याच्या तयारीत असतानाच सचिव, गणेश गुर्जर यांनीच सर्वांचे आभार मानून कार्यक्रम आवरता घेतला, कारण त्यानंतर वैवाहिक जीवनात ५० वर्षे पूर्ण केलेल्या पती-पत्नींचा तसेच गुणी-जनांचा सत्कार सोहळा होता. माझा मात्र हातातोंडाशी आलेला घास गेला.

महासंघाच्या प्रगतीची आंतरिक तळमळ असणाऱ्या तसेच महासंघाच्या कार्याचे शिवधनुष्य समर्थपणे पेलणाऱ्या गणेश गुर्जर यांच्यासारख्या सात्विक, प्रसन्न, सदाबहार व्यक्तीवर रागवायचे तरी कसे! माझ्याकडे आभार मानण्याची जबाबदारी सोपवली आहे याची त्यांना पुसटशीदेखील कल्पना नसेल. स्टेजचे भाग्य आपल्या नशिबी नाही हेच खरे, असे म्हणून मी मनाची समजूत घालत असतानाच संपादक श्रीगजानन गुर्जर माझ्याजवळ आले, मला म्हणाले, ''पुढच्या बैठकीच्या वेळी तुम्हीच आभार मानायचे, आतापासून तुम्हाला बुक करून टाकतो.'' माझ्या मनात विचार आला ऐनवेळी त्यांनी माझे बुकिंग दुसऱ्या कुणाला दिले नाही म्हणजे गंगेत घोडे न्हाले.

मंडळी- बैठकीच्या निमित्ताने आपल्यामध्ये कळत नकळत जी एक स्नेहाची रेशमी वीण विणली जात आहे. ती आपण आता भावी काळात अधिक घट्ट करू आणि महासंघाचा नावलौकिक वृद्धिंगत करू या. शेवटी एवढेच सांगतो, त्यावेळी जर मी स्टेजवर असतो तर नक्कीच आपणा सर्वांना नम्र विनंती केली असती की, रत्नागिरी कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे अध्यक्ष, महिला आघाडी कार्यकर्ते, भगिनींसाठी एकदा जोरदार टाळ्या झाल्या पाहिजेत.

खरे तर मी न मानलेल्या आभाराच्या या गंमतीचा विषय आपण बाजूला ठेवू. लेखन हा माझा प्रांत नाही. साहित्याशी माझी तितकीशी जवळीक नाही. मला याची जाणीव आहे. तथापि, मी जे पाहिले, अनुभवले, माझ्या मनाला जे भावले ते मोडक्या तोडक्या शब्दांत रेखाटण्याचा माझा हा प्रामाणिक प्रयत्न आपण गोड मानून घ्यावा.

**स. ना. तथा बाळासाहेब भाटे,**
सातारा
भ्रमणध्वनी : ९४२२४ ०२६४९

## वाचकांचा अभिप्राय

महोदय,

माझे व्याही डॉ. धनंजय वाखले ह्यांचेकडे मध्यंतरी पुण्यात गेलो असता त्यांनी आपला 'संपर्क' नियतकालिकेचा एप्रिल - जून २०१८ चा अंक दिला. मला वाचनाची व लिखाणाची आवड असल्याने तो मी संपूर्ण वाचला. तो नक्कीच वाचनीय वाटला. त्यात सहभागी असणाऱ्या सर्वांचे मनापासून अभिनंदन.

सद्य परिस्थितीत ब्राह्मण समाजाला अत्यंत वाईट परिस्थितीतून जावे लागत आहे. असे असतांना निरनिराळ्या उपजातीतील (ब्राह्मण समाजाच्या) ज्येष्ठ मंडळी आपआपल्यापरीने संस्कृती टिकवण्यासाठी जिवापाड मेहनत घेत आहेत. ही पण एक बाब महत्त्वपूर्ण आहे, पण त्याचबरोबर 'कुऱ्हाडीचा दांडा, गोतास काळ' ह्या म्हणीचा प्रत्यय येतो. तो ज्यावेळी एखादी व्यक्ती नाण्याच्या एकाच बाजूने विचार करून आपले मत मांडते, तसेच काहीसे 'सासू-सासऱ्यांसाठी मौलिक सल्ला' ह्या लेखाचे झाले असे म्हणण्याचे मी विनयपूर्वक धारिष्ट्य करतो आहे. त्यामुळे ह्या पत्रासोबत नाण्याची दुसरी बाजू मांडण्याचा प्रयत्न करतो आहे. ते आपल्याला मान्य असल्यास पुढील अंकात प्रसिद्ध करावे ही विनंती.

मी गेली १०/१२ वर्षे 'परशुराम' ह्या औरंगाबाद येथील चित्पावन मंडळातर्फे प्रसिद्ध होणाऱ्या मासिकाचा सांपादक म्हणून कार्य करतो आहे. आकाशवाणी, निरनिराळी दैनिके, सभा ह्यातून मी माझे विचार लेखी अथवा तोंडी मांडत असतो.

आपल्या ब्राह्मण समाजाने पूर्वापार चालत असलेली एकत्र कुटुंब पद्धती आगामी काळात न राबवल्यास येणारी पिढी कशी भरकटेल ह्याचा नेम नाही व ते तसे न व्हावे म्हणून प्रयत्नशील आहे व तेही सर्वत्र निराशाजनक चित्र दिसत असतांना, म्हणून हा शब्दप्रपंच.

आपल्या सर्वांची उर्वरित काळात प्रगती होवो ही सदिच्छा.

**- सुहास सहस्रबुद्धे, औरंगाबाद** (मो. ९५५२८ ७०६४६)

# संस्थावृत्त

## कऱ्हाडे ब्राह्मण संघ मुलुंड



मुलुंडचे प्रसिद्ध गायक पं. प्रदीप नाटेकर यांना दिनांक १५.०४.२०१८ रोजी पनवेल कल्चरल असोसिएशनचा त्यांनी केलेल्या ''शास्त्रीय संगीत'' सेवेबद्दल, योगदानाबद्दल पुरस्कार देण्यात आला. सुप्रसिद्ध लेखिका कवयित्री श्रीमती अरुणा ढेरे या प्रमुख पाहुण्या होत्या. पं. प्रदीप नाटेकर यांचे पुरस्कार मिळाल्याबद्दल कऱ्हाडे ब्राह्मण संघ-मुलुंड तर्फे हार्दिक अभिनंदन!

पं. प्रदीप नाटेकर यांचे गायनाचे प्राथमिक शिक्षण ग्वाल्हेर घराण्याचे पं. राजारामबुवा पराडकर यांच्याजवळ झाले. त्यानंतर जवळजवळ २० वर्षे संगीत भूषण पं. राम मराठे यांच्याकडे झाले. रामभाऊंजवळ ग्वाल्हेर, आग्रा, जयपूर या तिन्ही घराण्यांची तालीम त्यांना मिळाली. रामभाऊंनंतर पं. मधुकर जोशी यांचे मार्गदर्शनही त्यांना मिळाले. संपूर्ण वेळ गाण्यासाठी देता यावा यासाठी त्यांनी १९९६ साली माजगांव डॉकमधली नोकरी सोडली.

गुरुकुल पद्धतीनी ते संगीताचे शिक्षण देतात. पं. प्रदीप नाटेकर ह्यांची कन्यका श्रीमती मृणाल नाटेकर-भिडे ही पनवेल कल्चरल सेंटरच्या होणाऱ्या गायन स्पर्धेत प्रथम पारितोषिक विजेती आहे. तसेच सुपुत्र रोहित नाटेकर हे सुद्धा तबल्याच्या एकल वादनात प्रथम आलेले आहेत.

पं. प्रदीप नाटेकर यांची सांगीतिक वाटचाल अशीच चालत राहो. त्यांना दीर्घायुरोग्य लाभो हीच सदिच्छा!

– **श्रीपाद सप्रे** (कार्यवाह, कऱ्हाडे ब्राह्मण संघ,) मुलुंड

## कऱ्हाडे ब्राह्मण संघ, सातारा



सातारा कऱ्हाडे ब्राह्मण संघातर्फे रविवार दि. २९ एप्रिल २०१८ रोजी सायं. ६ वा. सुपनेकर हॉल, सातारा येथे डॉ. विक्रांत महाजनी, संचालक समर्थ हॉस्पिटल, सातारा यांचा 'संवाद-वैद्यकीय विश्वाशी', हा उद्‌बोधक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाची सुरूवात कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे उपाध्यक्ष श्री. बाळासाहेब भाटे यांच्या प्रास्ताविकाने झाली. संस्थेच्या विविध उपक्रमांची थोडक्यात माहिती देवून सर्व कार्यक्रम समाजातील सर्वांना खुले असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. त्यानंतर डॉ. चंद्रशेखर तांबे यांनी वैद्यकीय क्षेत्रातील औषधे, उपचार पद्धती, दवाखान्यातील सोयी यांच्या गेल्या ३-४ पिढ्यांपासून कसा बदल होत गेला याचा आढावा घेतला व डॉ. विक्रांत महाजनी यांचा परिचय करून दिला. डॉ. विक्रांत महाजनी यांनी उपस्थित श्रोत्यांशी अगदी सोप्या पद्धतीने संवाद साधत जेनरीक औषधे व ब्रँडेड औषधांचे महत्त्व, दवाखान्यातील अत्याधुनिक सोयी उभारताना असणारे नियम, काटेकोरपणा व त्यासाठीचा खर्च, प्रशिक्षित नर्सेसची गरज, सुसज्ज ऑपरेशन थिएटर, अत्याधुनिक आय. सी. यु. विभाग याविषयी माहिती देवून लोकांमधील गैरसमज दूर होणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. तसेच आधुनिक काळातील सरकारी योजना किंवा खाजगी कंपन्यामार्फत वैद्यकीय विमा घेण्याचे महत्त्व विशद केले. श्री. सुधीर करंबेळकर यांनी आभार मानले व चहापानाने कार्यक्रमाचा समारोप झाला.

**श्री. अनिल काटदरे**

अध्यक्ष कऱ्हाडे ब्राह्मण संघ सातारा

# कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवली (पू.) जि. ठाणे

सार्वजनिक न्यास नोंदणी क्र. इ-४३८ (ठाणे) ७२
समाजमंदिर सभागृह, टिळकनगर विद्यामंदिर मार्ग, टिळकनगर, डोंबिवली (पू.) जि. ठाणे ४२१२०१
**दि. ०१/०४/२०१८ ते ३१/०३/२०२३ पर्यंत नवीन संचालक व सदस्यांची यादी**

| अ.क्र. | संचालक मंडळ | | मो. नं. |
|---|---|---|---|
| १. | **श्री. सुहास म. पंडित** | अध्यक्ष | ९८३३३ ०४०३३ |
| २. | **सौ. क्षमा सु. धामणकर** | उपाध्यक्ष | ९९६७० ७०२१८ |
| ३. | **श्री. नितीन स. शेंबेकर** | सहकार्यवाह | ९८२००४३२४४ |
| ४. | **श्री. संदीप सु. पुराणिक** | कार्यवाह | ९८५०० ९४३०० |
| ५. | **श्री. विनायक दि.जांभेकर** | सहकार्यवाह | ९८१९५०४५९२ |
| ६. | **श्री. अशोक शं. भागवत** | कोषपाल | ९८३३६ ८४१०० |
| ७. | **श्री. प्रदीप श्री. हळबे** | उपकोषपाल | ९८३३१६३६५९ |

| अ.क्र. | सदस्य | मो. नं. |
|---|---|---|
| १. | **डॉ. अरुण अ. नाटेकर** (आरोग्य समिती प्रमुख) | ८०८०२ ८१९७८ |
| २. | **सौ. मीनाक्षी प. काळेले** (शिक्षण समिती प्रमुख) | ९८१९० १५८३० |
| ३. | **श्री. वासुदेव ना. रायकर** (सामान्य प्रशासन व वधू-वर सूचक मंडळ प्रमुख) | ७७३८४ ५५५८८ |
| ४. | **श्री. आनंद चिं. सरपोतदार** (सांस्कृतिक समिती प्रमुख) | ७३५०५ ०४४८३ |

कऱ्हाडे ब्राह्मण संघ डोंबिवली यांच्या कार्यकारिणी समितीस हार्दिक शुभेच्छा.

# क. ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवली - संक्रांत संमेलन २०१८

संस्थेचे यावर्षीचे संक्रांत संमेलन रविवार दि. २८/०१/२०१८ रोजी सायंकाळी ४.३० ते ९.३० या वेळेत आयोजित करण्यात आले.

सदर कार्यक्रमात गोव्याचे वेदमूर्ति श्री. दत्तभार्गव गुलाब टेंगसे व रायगड भूषण व कीर्तनकार मा.श्री. श्रीराम अनंत पुरोहित यांचा शाल श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

याचबरोबर मा. श्री. शरद वामन पुसाळकर (संस्थापक-सदस्य कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवली), श्री. श्रीराम गजानन देवस्थळी (प्रसिद्ध व्यावसायिक व सामाजिक कार्यकर्ते) आणि सौ. मेघना सचिन आंबेकर (संचालिका डोंबिवली नागरी सहकारी बँक) यांचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गुणगौरव करण्यात आला. गझलकार व हार्मोनियम वादकही असलेल्या वेदमूर्तींनी विचारांना चालना देणारे मनोगत व्यक्त करत एक स्वरचित गझलही पेश केली. प्रमुख सत्कारमूर्ती श्री. श्रीराम अनंत पुरोहित यांनीही मनाचा ठाव घेणारे मनोगत व्यक्त केले व उपस्थितांची मने जिंकली.

दोन्ही मानपत्रांचे लेखन करणाऱ्या सौ. गीता काटदरे केतकर यांचाही या प्रसंगी सत्कार करण्यात आला.

या सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. माधुरी येल्लापूरकर व सौ. रेवती धामणकर यांनी केले.

मध्यंतरानंतर श्री सुयश सर्व्हिसेसच्या सर्वेसर्वा सौ. स्वाती सुहास पंडित प्रायोजित सौ. धनश्री नानीवडेकर निर्मित व श्री. समीर लिमये आणि मानसी जोशी प्रस्तुत 'कार्पोरेट कीर्तन' हा 'दासबोध-रामदास स्वामी' यावर आधारित अप्रतिम कार्यक्रम सादर करण्यात आला.

*शब्दरुपी तिळगुळाचा कर्णमधुर गोडवा,*
*रसनेला चुकवून थेट मनापर्यंत पोचवा।*
*संस्थेबद्दलचा हा प्रेमभाव, उत्तरोत्तर असाच वाढवा।।*
*आलाच जर चुकून दुरावा, तर सामंजस्याने हलकेच संपवा।।*

असा संदेश देऊन सशुल्क भोजनाने समारंभाची सांगता झाली.

प्रथम सत्राची सांगता - संपूर्ण वंदेमातरम् (सौ. माधुरी येल्लापूरकर) व दुसऱ्या सत्राची सांगता करुणाष्टकांनी करण्यात आली. (श्री. समीर लिमये व मानसी जोशी) सर्व कार्यक्रमाला उपस्थितांचा प्रचंड प्रतिसाद लाभला.

**सौ. माधुरी येल्लापूरकर**
(महिला कार्यकारिणी कार्यवाह)

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ पुणे - वासंतिक मेळावा :२०१८

कऱ्हाडे ब्राह्मण संघ पुणे शाखेचा वासंतिक मेळावा, रविवार दि. १५ एप्रिल २०१८ रोजी पुण्याई सभागृह कोथरूड येथे थाटाने साजरा झाला. कऱ्हाडे ज्ञातितील कलाकारांनी एकत्र येऊन; 'स्वर-वसंत' हा सिनेगीत, नाट्यगीत, भावगीत, गौळण, गझल, लावणी, कव्वाली, अभंग आदी संगीत प्रकारांचा कार्यक्रम सादर केला. गायक सोमनाथ जायदे, आभा पुरोहित, वृषाली मावळंणकर, माधुरी करंबेळकर यांनी विविध गाणी सादर केली व त्यास अभिजित जायदे (तबला), मिलिंद गुणे (हार्मोनियम), आदित्य आपटे (साइड रिदम), केदार परांजपे (सिंथेसायझर) यांनी साथ केली. याच्या जोडीला प्रसिद्ध निवेदक श्री. अविनाश हळबे आणि वैशाली वर्णेकर यांच्या खुमासदार निवेदनाने कार्यक्रमाची लज्जत वाढली. या कार्यक्रमात गायकांनी सर्व गायन प्रकार अत्यंत ताकदीने सादर केले व त्यास उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली.



श्री. दिलीप कोटिभास्कर-बांधकाम श्री.

यानंतर ज्या व्यावसायिक ज्ञातीबांधवांनी आपल्या व्यवसायातून दुसऱ्या व्यावसायिक ज्ञातीबांधवास वर्ष २०१७-२०१८ मध्ये व्यवसाय दिला, अशा KBBF चे श्री. जयंत आठल्ये-प्रबोधन इंजिनिअर्स, बारामती व श्री. दिलीप कोटिभास्कर, बांधकाम व्यासायिक या दोन सदस्यांचा उद्योजकता सहकार्य पुरस्कार वर्ष पहिले (२०१७-२०१८) असे स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

अध्यक्ष श्री. लक्ष्मीकांत देसाई यांनी आपल्या भाषणात आरक्षणामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांना उत्तर म्हणजे उद्योजकता आहे आणि त्यास प्रोत्साहन म्हणून आपल्या ज्ञातीबांधवानांच शक्यतो आपल्या कडील व्यवसाय द्यावा व त्यास प्रोत्साहन म्हणून हे सत्कार आहेत; तसेच सभासदांनी आपली सर्व कामे उदा. बांधकाम, विमा, गुंतवणूक, इंटिरिअर ही आपल्या ज्ञाती बांधवांना द्यावीत असे आवाहन केले.


सहकाराला उत्तर देताना श्री. जयंत आठल्ये यांनी आपल्याला व्यवसायाचं बाळकडू आपल्या आईकडून मिळाले. तसेच व्यवसाय हाच राष्ट्रसमृद्धीचा मार्ग आहे असे सांगितले. त्याचप्रमाणे श्री. दिलीप कोटिभास्कर यांनीही स्वत:च्या बांधकाम व्यवसायाबद्दल माहिती दिली व या सर्व कामात मुलगा आणि पत्नी दोघेही अतिशय जबाबदारीने बरोबरीने व्यवसाय सांभाळतात असे सांगितले. तसेच व्यवसाय करताना सर्व कुटुंबाने एकत्र येऊन साथ दिल्यास तो अधिक समृद्ध होतो आणि सकारात्मक विचार केल्यास निसर्ग, दैवीशक्ती ह्या तुमचे ध्येय पूर्ण करण्यास तुमच्या पाठीशी उभ्या राहतात असे सांगितले. आपल्या ज्ञाती बांधवांनी व्यवसायात पदार्पण करावे व त्यास आपण सर्व कायम पाठिंबा देऊ, असे प्रतिपादन केले.

स्वागत उमेश नवाथे या तरूण युवाने केले व सूत्रसंचालन युवा, मधुरा शेजवलकर हिने केले. आभार प्रदर्शन संघाचे सचिव श्री. हेमंत पुराणिक यांनी केले आणि कार्यक्रमाचे छायाचित्रण युवा हृषिकेश पळसुले यांनी केले.

ह्या कार्यक्रमास कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे सर्व कार्यकारिणी सभासद उपस्थित होते. यानंतर सर्व कलाकारांनी पसायदान म्हटले व भोजनोत्तर कार्यक्रम संपन्न झाला.

**लक्ष्मीकांत देसाई**

अध्यक्ष, कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे





# कऱ्हाडे ब्राह्मण संघ पुणे - राणी लक्ष्मीबाई स्मृतिदिन





दिनांक १८ जून, रणरागिणी, स्वातंत्र्यसेनानी, झाशीच्या राणी लक्ष्मीबाई यांचा पवित्र स्मृतिदिन. पुणे संघातर्फे, बालगंधर्व रंगमंदिर परिसरात असलेल्या अश्वारूढ पुतळ्याला पहिला पुष्पहार पुण्याच्या प्रथम नागरिक मा.सौ. मुक्ता टिळक महापौर यांनी अर्पण केल्यानंतर पुणे संघाचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीकांत देसाई यांनी पुण्याच्या कऱ्हाडे ब्राह्मण संघातर्फे पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर राष्ट्रसेविका दल आणि हिंदु महिला सभा तसेच मॉडर्न गर्ल्स हायस्कूलच्या वतीने मुख्याध्यापिका यांनी पुष्पहार अर्पण केला.

याप्रसंगी कार्यकारिणी सभासद श्री. फणसळकर, श्री. सतीश भोपटकर, श्री. गोपाळ भाटवडेकर, श्रीगजानन गुर्जर, श्री. श्रीकांत गुर्जर, श्री. सप्रे, सौ. मुक्ता चांदोरकर, सौ. वैशाली वेर्णेकर, आणि महासंघाचे सचिव श्री. गणेश गुर्जर तसेच श्री. गिरीश टोळे, के.बी.बी.एफ. चे अमित शहाणे यांच्यासह संघाचे अनेक सन्माननीय सभासद उपस्थित होते. सर्वांनी झाशीच्या राणीला अभिवादन केले. मॉर्डन हायस्कूलच्या बँड पथकाने मानवंदना दिली.

**– गणेश गुर्जर**
सचिव, कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ठाणे - वासंतिक कार्यक्रम



मंगळवार दि. १ मे, २०१८ रोजी सायंकाळी ५ ते रात्री ८ या वेळेत कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ठाणे यांचा वासंतिक कार्यक्रम मराठी ग्रंथ संग्रहालय सभागृहात यशस्वीपणे संपन्न झाला. या कार्यक्रमात कै. श्री. शरद तळवलकर यांचे शिष्य अशी बिरुदावली असलेले, सर्वोत्कृष्ट बालगंधर्व व राष्ट्रगौरव पुरस्कार मिळवलेले व्याख्याते, अनेक नाटकांतून, मराठी व हिंदी मालिकांतून प्रमुख भूमिका साकारणारे नट, अक्षय थिएटर्स या व्यावसायिक नाट्यसंस्थेचे संस्थापक श्री. श्रीप्रकाश सप्रे, पुणे यांनी 'सप्रेम नमस्कार' हा एकपात्री विनोदी प्रयोग सादर केला. याच कार्यक्रमात ठाणे संघाला इमारत निधी देणाऱ्या देणगीदारांचा ठाणे संघाचे अध्यक्ष श्री. संजय आंबर्डेकर यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाची सांगता आंबेडाळ व पन्हे या अल्पोपहाराने झाली.

**– संदीप कळके, कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ठाणे**

*** कऱ्हाडे ब्राह्मण महासंघास हार्दिक शुभेच्छा! ***
श्री. संजय आंबर्डेकर, ठाणे
मो. ९८२०४ १७९८१

# रत्नागिरी कऱ्हाडे ब्राह्मण सहकारी संघातर्फे राणी लक्ष्मीबाई पुरस्कार प्रदान



रविवार दि. २४ जून २०१८ रोजी सायंकाळी कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या राणी लक्ष्मीबाई सभागृहात; चिपळूणची आंतरराष्ट्रीय योगपटू आर्या तांबे हिला रत्नागिरी कऱ्हाडे ब्राह्मण ज्ञातीतर्फे झाशीची राणी लक्ष्मीबाई पुरस्कार प्रख्यात लेखक, व्याख्याते उदय सप्रे यांनी स्नेहपूर्वक प्रदान केला.

या वेळी अध्यक्ष माधव हिर्लेकर, उपाध्यक्ष मिलिंद आठल्ये, सीए चंद्रकांत हळबे, सौ. प्रतिभा प्रभुदेसाई, सचिव सौ. मृणाल टिकेकर आदी प्रमुख उपस्थित होते. सुरुवातीला दीपप्रज्वलन व झाशीची राणी लक्ष्मीबाईंच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

संघाचे अध्यक्ष माधव हिर्लेकर यांनी प्रास्ताविक केले.

भास्कर गंगाधर हिर्लेकर यांनी पत्नी कै. सौ. सुमित्रा हिर्लेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिलेल्या देणगीतून राणी लक्ष्मीबाई पुरस्कार प्रदान केला. योगपटू आर्या हिने कऱ्हाडे ज्ञातीबांधवांचे विशेष आभार मानले. योगपटू कशी झाले आणि घरच्यांचे प्रोत्साहन कसे मिळाले, हे तिने सांगितले. यावेळी आर्याचे शिक्षक रणवीर सावंत यांचाही सत्कार करण्यात आला.

यावेळी संघाचे अध्यक्ष माधव हिर्लेकर यांनी रत्नागिरी कऱ्हाडे ब्राह्मण संघातर्फे आयोजित कार्यक्रमात ठाण्यातील लेखक, व्याख्याते उदय सप्रे यांचा सत्कार केला.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून श्री. उदय सप्रे यांनी १८५७ चा स्वातंत्र्य संग्राम थोडक्यात मांडला. 'भारतीय इतिहासामध्ये १८५७ ची लढाई जिंकलो असतो तर त्यावेळीच स्वातंत्र्य मिळाले असते. परंतु, विश्वासघात व भीतीमुळे या लढ्यात अपयश आले. आजही तेच चालू आहे. म्हणूनच शिवछत्रपतींना घडवणाऱ्या जिजामाता आणि दामोदरला पाठीवर घेऊन लढणाऱ्या राणी लक्ष्मीबाईंसारख्या मातांची समाजाला नितांत गरज आहे. आपण भारतीय म्हणूनच जगले पाहिजे.'

त्यांनी राणी लक्ष्मीबाईंचे या लढ्यातील योगदान सांगितले. तसेच त्याचा आपणा सर्वांना अभिमान असला पाहिजे, असे मत व्यक्त केले आणि म्हणाले की, '१८५८ मध्ये रजपूत राजा कुंवरसिंहाने इंग्रजांचा चार-पाच वेळा पराभव केला. छत्रपती शिवरायांच्या गनिमीकाव्याचा उपयोग त्याने केला. तो चतुर राजा होता. इंग्रजांनी ताब्यात घेतलेला आझमगड राजवाडा, किल्ला त्याने आठ महिन्यांत परत मिळवला व त्याचा झेंडा फडकावला आणि मगच प्राण सोडला. निधड्या छातीने लढणारे व गनिमीकावा करणारे लढवय्ये सैनिक त्याच्याकडे होते. त्याचा भाऊ अमरसिंह यानेही तीन-चार महिने किल्ला शाबूत ठेवला होता.

विश्वासघात व भीतीमुळे भारताचा पराभव झाल्याचे आपण इतिहासात पाहतो. सद्यस्थितीत जगताना आपण भारतीय म्हणून जगत नाही. पंजाबी, गुजराती, मराठी अशा प्रांतवादात जगतो. जनगणनेच्या वेळीही भारतीय म्हणून नोंद होत नाही. ती अत्यावश्यक आहे. शिवाजी जन्माला येण्यासाठी समाजाला जिजाऊंची गरज आहे. तितकीच गरज दामोदरला पाठीवर घेऊन लढणाऱ्या झाशीच्या राणीचीही. आजच्या व्याख्यानानंतर एकाला तरी वाटले पाहिजे की माझा मुलगा सैन्यात जावा.'

पान २६ वर

पान २५ वरून

कार्यक्रमात यानंतर विवाहाला ५० वर्षे झालेल्या कऱ्हाडे ज्ञातीतील दांपत्यांचा सत्कार झाला. यामध्ये सुधाकर देवस्थळी-सौ. स्मिता देवस्थळी (चोरवणे, संगमेश्वर), मनोहर पंडित- सौ. माधुरी पंडित (रत्नागिरी), गजानन मुळ्ये-सौ. अलका मुळ्ये (वळके, रत्नागिरी), वासुदेव पराडकर-सौ. सुधा पराडकर (कोट, लांजा), दत्तात्रय भागवत-सौ. मालती भागवत (रत्नागिरी), श्रीराम कात्रे-सौ. संगीता कात्रे (रत्नागिरी) आणि मनोहर डिंगणकर-सौ. सुषमा डिंगणकर (डिंगणी, संगमेश्वर) यांचा समावेश होता. देणगीदार राजाभाऊ टोळ्ये यांचा सत्कार केला. यावेळी शर्वाणी ढवळे हिने सुरेख सूत्रसंचालन केले. मिलिंद आठल्ये यांनी आभार मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यकारिणीच्या सर्व सदस्यांचे अनमोल सहकार्य लाभले.

**– माधव हिर्लेकर**
अध्यक्ष, रत्नागिरी क. ब्राह्मण सहकारी संघ मर्या. रत्नागिरी

कव्हर पान ३ वरुन....

**सत्कारमूर्ती :–**

१. **श्री. भवानीशंकर पाध्ये** – वेरळ तालुका लांजा – दरवर्षी रक्तदान शिबिरे घेतात. दर मे महिन्यात धार्मिक नित्यकर्माचे शिक्षण देण्यासाठी निवासी वासंतिक वर्ग स्वखर्चाने घेतात.

२. **डॉक्टर महेंद्र पाध्ये**
आयुर्वेदाचा प्रचार आणि प्रसार. पूर्ण आयुर्वेदिक पद्धतीने उपचार, स्वत: औषधे निर्माण करतात. – वंध्यत्व निवारणाबाबत आयुर्वेद उपचार, पद्धतीत सूक्ष्म संशोधन करून अनेकांना लाभ मिळाला आहे. पंचकर्म उपचारात विशेष प्राविण्य

३. **डॉक्टर आशुतोष गुर्जर** रत्नागिरी – पूर्ण आयुर्वेदिक पद्धतीने उपचार. स्वत: औषध निर्मिती करतात.

४. **श्री. सुहास ठाकूरदेसाई** – रत्नागिरी – यशस्वी उद्योजक. रत्नागिरी येथे स्कूबा डायविंग व अन्य 'जलधिक्रीडा' रत्नागिरीकर व पर्यटक यांना उपलब्ध करून देण्याचे श्रेय.

५. **कु. सिद्धी बोंद्रे** – रत्नागिरी- संगीत नाटक, शास्त्रीय व नाट्य संगीतात प्राविण्य व विविध पुरस्कार विजेती.

विशेष पुरस्कार प्राप्त सत्कारमूर्तींनी स्वत:चा कार्याबद्दल मनोगत व्यक्त केले. त्यानंतर मा. श्री. गणेश गुर्जर यांनी महासंघाची उद्दिष्टे व कार्य उद्धृत केले. महासंघाचे अध्यक्ष मा. श्री. विजयजी आंबर्डेकर यांनी एकूण समारंभाविषयी संतोष व्यक्त केला.

महासंघाने त्रैमासिक सभा आयोजनाची दिलेली संधी, सहकार्य, मार्गदर्शन तसेच रत्नागिरी संघाच्या पदाधिकारी व सभासद यांचे सहकार्य याबद्दल रत्नागिरी संघाच्या अध्यक्षांनी आभार व्यक्त केले व कु. सिद्धी बोंद्रे हिच्या मधुर आवाजातील गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

दुपारच्या सत्रातील विशेष कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. प्रतिभा प्रभुदेसाई, कमिटी सदस्य, रत्नागिरी संघ, यांनी प्रभावीपणे केले.

महासंघाची सभा व कार्यक्रम सुनियोतितपणे संपन्न होण्यासाठी उपाध्यक्ष श्री. मिलींद आठल्ये, व कमिटी सदस्य श्री. दिलीप ढवळे, श्री. मानस देसाई, सौ. प्रभुदेसाई आणि सर्वांचे कुटुंबीय यांनी परिश्रम घेतले.

**सौ. प्रतिभा प्रभुदेसाई,**
रत्नागिरी कऱ्हाडे ब्राह्मण सह. संघ मर्या.

## कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबई – चैत्रगौर वासंतिक हळदीकुंकू समारंभ

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबई यांचा चैत्रगौर वासंतिक हळदीकुंकू समारंभ दिनांक ७ एप्रिल २०१८ रोजी सायंकाळी ६ ते ८ या वेळेत संघाच्या गिरगांव येथील कार्यालयात संपन्न झाला. दरवर्षीच्या प्रथेप्रमाणे, यंदाही सर्व महिला कार्यकर्त्यांनी हा हळदीकुंकू समारंभ परंपरेनुसार व मोठ्या उत्साहाने साजरा केला.



संघाच्या महिला कार्यकर्त्यांपैकी सौ. भाग्यश्री सरपोतदार, सौ. अमृता किर्लोस्कर, सौ. अलका डोंगरे, सौ. अनुराधा ढवळे यांनी रंगबिरंगी सुवासिक फुलांच्या माळांनी चैत्रगौरीची सुंदर आरास मांडली. त्यानंतर देवीला खिरापत, आंबाडाळ, कैरीपन्हे आदींचा नैवेद्य दाखवून हळदीकुंकू समारंभाला सुरुवात झाली. या स्वादिष्ट नैवेद्याची व्यवस्था संघाच्याच कार्यकर्त्या सौ. नेहा पोखरणकर यांनी उत्तमरीत्या केली होती.

हळदीकुंकू समारंभ म्हणजे महिलांचे जणू 'स्नेहसंम्मेलनच' दरवर्षीप्रमाणे यंदाही या कार्यक्रमासाठी महिलावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. तसेच संघाचे पदाधिकारी व सर्व कार्यकर्तेसुद्धा आंबाडाळ, पन्हे आदींचा आस्वाद घेण्यासाठी आवर्जून उपस्थित होते.

अशा प्रकारे कायम मिळणारे संघाचे पाठबळ व महिला कार्यकर्त्यांनी केलेली उत्तम तयारी व व्यवस्था पाहून उपस्थितांनी सर्वांचे खूप कौतुक केले.

**सौ. भाग्यश्री अरविंद सरपोतदार**

* कऱ्हाडे ब्राह्मण महासंघास हार्दिक शुभेच्छा! *
श्री. विजय आंबर्डेकर, मुंबई
मो. ९८१९८ ८५६६५

## कविता

# *** अमुचा गाव ***

रम्य टेकडी तिला बिलगुनी एक चिमुकला गाव।
मावळप्रांती खडकावरती 'खडकाळे' त्या नांव ।।१।।

दुजे नाम जे प्रसिद्ध मोठे रूढ 'कामशेत'।
तांदूळ पिकवी विविध प्रतींचा इथे आसमंत ।।२।।

मंदिर शाळा रुग्णालयही पंचायत बरवी।
गजबजणारी ही भली पेठ की उलाढाल घडवी ।।३।।

भौमवासरी दर सप्ताही भरे भाजी मंडी।
मुळा भोपळा कांदा गाजर मिळे ताजी भेंडी ।।४।।

गावकरी हे साधेभोळे शेतकरी सगळे।
धान्ये भाज्या फुले तशीही पिकविती ऊसमळे ।।५।।

गाव आमचा पर्यटकांना आकर्षण मोठे।
वनांतरीचे गिरीकुहरींचे निसर्ग धन साठे ।।६।।

कुशीत त्यांच्या संथ निरामय बनुनी वक्राकार।
नदी वाहते इंद्रायणी जी देत जीवनाधार।।७।।

रियासतीचे कर्वे थोर इतिहास स्वराज्य मराठी।
येथ विसावती सरदेसाई ते इंद्रायणीच्या काठी ।।८।।

गजर 'ग्यानबा तुकाराम'चा जलबिंदू करती।
देहू आळंदी तीर्थ क्षेत्री जाण्या लगबगती ।।९।।

पुढे डोंगर मागे डोंगर मध्ये पसरला माळ।
सोनेरी चमकते ऊन की स्वच्छ निळे आभाळ ।।१०।।

ऋतु येथले रूद्र भासती परी सुखकारकही होती।
हवा कोरडी शुद्ध निरोगी घ्या भरूनी छाती ।।११।।

चैत्र पालवी बहर वसंती कोकीळ करी कूजन।
फळे फुले ही वनी भरवती पक्षी संमेलन ।।१२।।

ग्रीष्म काल तो तनू भाजतो रणरणते ऊन।
घसा कोरडा पाणी मागे तहान तहान ।।१३।।

सुसाट वारा या जलधारा करिती वर्षागान।
लखलख बिजली साथीलाही कडकडते थैमान ।।१४।।

न्हाऊन धरती लेऊन वसनी जणू की हिरवेरान।
ऊन कोवळे कृष्ण मेघही शोभतसे गगन ।।१५।।

भरे हुडहुडी मार्गशीर्षी या गात्रे गारठती।
धुक्या दवाने परिसर होतो जणू शीतपेटी ।।१६।।

ऊब घराची पांघरुणांची किती गोड विश्रांती।
गरम चहाची लज्जत न्यारी शेकोटी भंवती ।।१७।।

नदी किनारी घरकुल अमुचे इवलेसे टुमदार।
आजी आजोबा आई बाबा भावंडे परिवार ।।१८।।

जो तो असतो दंग अपुल्या व्यवसायी रुचीच्या।
रात्री रंगती गप्पा परी त्या खास शिळोप्याच्या ।।१९।।

धडाड धड ही गाडी धावे लोहमार्ग तुडवीत।
महामार्ग तो असे पलिकडे लागे जणूं शर्यत ।।२०।।

मुंबापुरीला पुण्यपुरीला जोडतात हे दुवे।
वाटेवरती त्या आम्ही निरखतो चेहरे नवनवे ।।२१।।

कुणी येतसे गाडीमधुनी होत प्रतीक्षा चाळा।
येती पाहुणे सगे सोयरे घडे गोड सोहळा ।।२२।।

....तर असा हा आमचा गाव! वर्णन बरच लांबलं का? पण असो त्याला काही इलाज नाही. इथे या निमित्ताने आपल्याला एक विनंती करण्याची संधी साधून घेतो.

रियासतकार कै. गोविंद सखाराम सरदेसाई यांचे निवृत्तीनंतर वृद्धापकाळांत कामशेतला नदीकाठी काही काळ वास्तव्य होते. साधारण १९४० च्या आसपासचा हा काळ! त्यांचा वाडा तेथे असून त्यांच्या भाऊबंद परिवारापैकी पुढील पिढीचे कोणी तेथे येऊन जाऊन असतात. तळेगाव येथील सर्वसाधारण रुग्णालय (तळेगांव जनरल हॉस्पिटल) ज्यांच्या नावाने प्रसिद्ध आहे ते कै. भाऊसाहेब सरदेसाई रियासतकारांचे कनिष्ठ बंधू आणि रियासतकार म्हणजे नानासाहेब ! कामशेतला या विस्मृतीत गेलेल्या आपल्या कर्तबगार ज्ञातिबांधवांचे काही उचित स्मारक व्हावे या भावनेतून हे लिहीत आहे. त्याची दखल कऱ्हाडे ब्राह्मण संघाने नाही घ्यायची तर कोणी घ्यायची? आपल्या स्नेही, परिचितांपैकी कोणी धाडशी, उपक्रमशील व्यक्तीने या कामी पुढाकार घेतल्यास आम्हाला शक्य होईल ते सहकार्य आम्ही देऊ.

...वि. पां. गुर्जरपाध्ये, तळेगांव दाभाडे, मो. ३४७८१७०७२०

# सासू-सासऱ्यांसाठी मौलिक सल्ला ....लेखाची दुसरी बाजू

आपल्या देशांत गेली अनेक शतके एकत्र कुटुंब पद्धती चालू आहे. आजही खेड्यातून/शहरातून राहणारी मंडळी, ती आपआपल्या कुवतीप्रमाणे चालू ठेवत आहेत, पण मुंबई, पुणे, नाशिक ह्या महानगरांत मुळातच निवासव्यवस्था अत्यल्प, त्यामुळे खुराड्यात राहण्यापरीस दुसरीकडे राहायला जाणे गरजेचे आहे. हे खरे असले तरी सासू-सासऱ्यांनी सुनेला/मुलाला दुसरे घर करण्याचा प्रस्ताव देणे किती योग्य ठरेल? ह्याउलट आर्थिक सुबत्ता असल्यास चार खोल्यांचा ब्लॉक घेण्यासाठी आर्थिक/मानसिक तयारी करून तसे वास्तव्य केल्यास सर्वजण एकत्र राहू शकतील ह्याकरिता मुलांच्या आई-वडिलांनीदेखील पुढाकार घेऊन विचारांचे/निर्णयाचे आदान-प्रदान करावे.

मुलीच्या आईनेच लग्नाचे आधी/लग्नानंतर सासू ही आता तुझीपण आईच आहे. तू त्यांना प्रेम दे, जसे मला देत होतीस, मी सांगितल्याप्रमाणे वागत होतीस, तसेच वाग. त्यामुळे भविष्यात तुलाच त्याचा फायदा होईल ह्याची जाणीव सातत्याने करून देऊन पुढील कटुता टाळता येऊ शकेल.

दोन वेगळ्या घराण्यातील दोन अपत्ये नवरा-बायको ह्या रूपात एक होतात. विशेषतः मुलीवर आईच्या घरातील संस्कार, कुलाचार, निरनिराळे सण साजरे करण्याच्या पद्धती भिन्न असू शकतात. ही जर गोष्ट सासू (सुनेची) समजू शकली तर आपल्या घरातील चालिरीती विश्वासात घेऊन समजाऊ शकली व सुनेने पण, नीट समजून घेऊन त्यावर अंमलबजावणी केली तर उभयपक्षी किती समाधान मिळेल?

आता एकत्र राहिल्यावर कामाचा बोजा वाढणार हे उघडच आहे. पण त्याचा बाऊ करून चालेल का? घरातील वडीलधारी मंडळी त्रयस्थासारखे वागणे शक्य नाही, तेव्हा दैनंदिन जीवनात वागतांना शारीरिक, मानसिक, आर्थिक जबाबदाऱ्या पार पाडतांना संकुचित वृत्तीने राहून संसार होत नसतो म्हणून प्रत्येकाने आपल्या योग्यतेचे, क्षमतेचे, शक्य असल्यास आवडीचे अर्थात इतरांनाही ते भावले पाहिजे, अशी कामे केली तर घर कसे आनंदी व प्रसन्न होईल! ह्या संदर्भातील लेखकाने मुद्दा क्र. ४ मध्ये जे म्हटले आहे, ते वाचल्यावर लेखकाला संयुक्त कुटुंब पद्धतीचा द्वेष वाटत असावा असे जाणवले. खरे म्हणजे आपल्या प्रत्येकाच्या हातांना पाच बोटे आहेत व ती सर्व आत वळवली तरी मूठ होते. एका बोटाने, दोन बोटाने जे साध्य होणार नाही ते काम सर्व एकत्र आल्यावर ती जी मूठ होते, जी बळयुक्त होते.

पुढच्या मुद्यात (५) लेखक म्हणतायत, मुलाच्या व सुनेच्या भांडणात मध्यस्थी करू नका. येथे सुनेच्या ऐवजी मुलगी असती तर? म्हणून सुनेला मुलीसमान वागणूक दिल्यास ती तुमचा आदरच करेल व मुलांना जर तुम्ही संस्कारित केले असेल तर तो तुमचे ऐकल्याशिवाय राहणार नाही. सत्य जाणून घेऊन योग्य-अशोग्य ठरवणे सोपे जाईल.

पुढे लेखक ६व्या मुद्यावर म्हणतायत की, नातवंडाच्या संगोपन तसेच भवितव्याबाबत सल्ले देऊ नका? - का? मग घरात वयस्कर, अनुभवी व स्वतःच्या मुलांचे हित/अहित करणारी मंडळी असताना त्यांनी तटस्थ राहायचे? वयाने आपण सर्वजण मोठेच होतो, म्हणजे सर्वकांही आपल्याला कळतेच असे नाही. आजी-आजोबा किंवा सासू-सासरा ह्या भूमिकेतील व्यक्तींनी न मागता सल्ले देऊ नये असे ही लेखक म्हणतात. मग त्या घरात राहायचे तरी कशाला?

सर्वच संस्कार शेवटपर्यंत टिकतात असेही नाही. लहानपणी आज्ञाधारक, विनम्र, आदर दाखवणारी व्यक्ती समाजात वावरायला लागली, मानमरातब मिळायला लागला, आर्थिक सुबत्ता आली की, त्या व्यक्तीच्या विचारसरणीत खूप मोठा फरक आढळतो व तो फरक/बदल घडतो. तो ज्या व्यक्तींच्या सहवासात येतो त्यांच्यामुळे. कारण दिवसातला बहुतांशी वेळ ही व्यक्ती कुटुंबापासून दूर असते व त्यावेळी त्यांच्या संपर्कात (मुलाच्या/सुनेच्या) जी मंडळी येतात, त्यांच्या सहवासात त्यांचे विचार भरकटून जातात आणि ह्यासाठी कुटुंबीयातील प्रत्येक व्यक्तीने दिवसातील काही वेळ कौटुंबिक सौख्याबाबत चर्चेसाठी नव्हे तर सुसंवादासाठी देणे गरजेचे पण आजकाल एकत्र यायला आवडत नाही, ना बोलायला. सकाळपासून कराग्रे वसते लक्ष्मी सारखा कराग्रे वसतो मोबाईल ही परिस्थिती असल्याने ते अशक्य होऊन बसलंय!

आयुष्याच्या उतरंडीवर लागलेल्या वृद्धांना नेमके काय हवे असते? दोन

प्रेमाचे शब्द, आदर, विचारपूस पण तेही अनेक घरांतून नाहीसे झाले आहेत. येथेही नाण्याची दुसरी बाजू येते, ती वृद्धांच्या खोडी, अहंभाव, अपेक्षा- पण हे जरी असले तरी त्यांच्या मुलांनी/सुनांनी सध्याच्या त्यांच्या वागण्याचा गैर अर्थ न घेता, त्यांनी आपल्याला जन्म दिल्यापासून स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी घेतलेल्या कष्टांची, त्यागाची थोडी जरी जाणीव ठेवली तर जाणाऱ्या व्यक्तीच्या डोळ्यांत शेवटी अश्रू असतील कृतज्ञतेचे, सार्थकतेचे आणि ते स्पष्ट उच्चारणार नाहीत पण भावना/इच्छा असेल, 'देवा असाच मुलगा/सून इतरांना पण दे!'

वाचकहो आता सभोवतालची परिस्थिती बघा. सगळीकडे ब्राह्मण समाजात बेकी, सर्वार्थाने एकाकी, कुसंगत लावून आपली तरुण पिढी बरबाद कशी होईल ह्याकडे ह्या ना त्या मार्गाने सतत प्रयत्नशील असणाऱ्या इतर सर्व (अनेक) समाजकंटकांशी आपल्याला टक्कर द्यायची आहे. कुठे काही दगाफटका झाला तर आधार देणारे आई-वडील / सासू-सासरे खूप गरजेचे आहेत. त्यांच्या उपस्थितीत देखील बळ आहे. त्यांचे सल्ले कधीच अहितकारक नाहीत अशी खात्री बाळगा. देव मानत असाल तर तो न दिसणारा देव पाठीराखा होऊ शकतो, तर जितेजागते माता-पिता/सासू-सासरे प्रत्यक्ष तुमच्या मदतीला येऊ शकतात, ह्याचे विस्मरण होऊ देऊ नका. ह्यांना कुठलाही नवस बोलावा लागत नाही. मोठ्या प्रमाणावर यज्ञयागही करावे लागत नाही. आज माझे आई-वडील नसल्याला अनेक वर्षे झाली पण सकाळी उठल्यावर व आंघोळीनंतर मी त्यांच्या तसबिरीला खाली वाकून नमस्कार करतो व त्यांचेही मला अस्तित्व ह्या ना त्या रूपात जाणवते. अनेक विविध प्रकारच्या समस्यांना तोंड देऊ शकलो तो केवळ एकत्र कुटुंब पद्धतीने. गेल्या दोन तीन दशकांतील घटस्फोटांची संख्या लाखांत असेल. त्यात ब्राह्मण समाजही दुर्दैवाने पुढे आहे. ह्याचा पण गांभीर्याने विचार व्हावा. लग्न झाल्यावर बायको अथवा सुनेकडून अपत्याची आशा ठेवणारे नवरे/सासू-सासरे गैर आहेत?

मी त्या समस्येवर गेली काही वर्षे काम करतो आहे. निदान ५/६ तरी घटस्फोटांची प्रकरणे यशस्वीरीत्या हाताळू शकलो. जुने नवे ह्यातील वाद दिवसेंदिवस तीव्र होत आहेत. ह्यासाठी मी उभय पक्षाची बाजू ऐकून घेण्याच्या दृष्टीने लवकरच एक उपक्रम हाती घेत आहे. ह्या लेखासंबंधी आपल्या मनातल्या प्रतिक्रिया मला समजल्या तर खूप बरे होईल. त्यातल्या त्यात विभक्त होऊ इच्छिणाऱ्या मंडळींकडून त्या कळाल्यास उत्तरे शोधणे सोपे जाईल.

समस्या म्हटले तर जटील आहे पण अशक्यही नाही. म्हणूनच हा शब्दप्रपंच.

**- सुहास सहस्रबुद्धे**
औरंगाबाद मो. ९५५२८७०६४६

---

## 'आचमन' का करायचे?

समाजात गुरुचरित्राबद्दल फार भाविकतेने बोलतात. मी मात्र अभ्यास म्हणून गुरुचरित्र वाचले. गुरुचरित्रात छत्तिसाव्या अध्यायात ब्राह्मणाच्या कर्माचरणात सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत २५ ते ३० वेळा आचमन सांगितले आहे. स्नानाअगोदर लघुशंका आचमन सांगितले आहे. (कामताच्या गुरुचरित्रात) मी त्या अध्यायातील आचमनांची लिस्ट केली. त्याप्रमाणे आठ दिवस आचमन त्या त्या प्रमाणे करून बघितले. मी संध्या करीत नाही. पण संध्या करायच्या ज्या वेळा आहेत त्यावेळी नुसते आचमन केले. शरीर हलके वाटू लागले. ॲसिडिटी कमी झाली. नंतर आचमनाच्या वेळी जी नावे घेतात ती न घेता फक्त आचमन म्हणजे प्रत्येक वेळी तीन पळ्या पाणी पिऊन पाहिले. तरी तोच फायदा झाला. हे मी माझ्या एक डॉक्टर मित्राला सांगितले. तो म्हणाला, बरोबर आहे. आपण पाणी कितीही प्यायलो तरी त्यातील थोडेसेच पाणी एका वेळी रक्तात घेतले जाते व अंतरा अंतराने घेतलेले थोडे पाणी रक्तात जाते. त्यामुळे रक्ताची घनता योग्य प्रमाणात राहून ॲसिडिटी, बी. पी. कमी होणारच. हल्लीचे सलाईन तरी काय आहे? तसेच आहे.

आहे ना? आमच्या पूर्वजांनी देवाच्या नावाखाली सामान्य लोकांना शरीर नीट ठेवण्यासाठी शास्त्रच वापरले. फक्त आम्हाला ते माहीत नाही म्हणून टाकाऊ म्हणून आम्ही ते सोडून दिले.

---

### * संस्कृत सुभाषित *

आपण नेहमी 'अजागळ' हा शब्द मराठीमध्ये वापरतो, त्याचे मूळ पुढील श्लोकामध्ये आहे :-

**धर्मार्थकाममोक्षाणां**
**यस्यैकोऽपि न विद्यते।**
**अजागलस्तनस्येव**
**तस्य जन्म निरर्थकम्।।**

**चाणक्यनीति** : ज्याला चार पुरुषार्थ म्हणजेच धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष ह्यापैकी काहीही मिळालेले नाही त्याचा जन्म बोकडाच्या गळ्याखाली लोंबणाऱ्या स्तनांसारखा निरर्थक आहे.

# फणस

फणस ही वट कुळात मोडणारी वनस्पती आहे. फणसाची फळे कोकण भागात अतिशय लोकप्रिय आहेत. कोकणात १५० ते २०० वर्षे वयाची फणसाची झाडे अनेक ठिकाणी आढळतात. कोकणात आणि पश्चिम घाटातील जंगलात फणसाची झाडे नैसर्गिकरीत्या वाढलेली दिसतात. फणस हे मोरेसिया या वनस्पती कुळातीळ फळझाड असून फणसाचे उगमस्थान भारत देश समजले जाते. भारतातून या झाडाचा प्रसार मलेशिया, वेस्ट इंडिज इत्यादी देशांत झाला. फणस दक्षिण आशियामध्ये मोठ्या प्रमाणात आढळतो. आरोग्याच्या दृष्टीने फणसाला अत्यंत महत्त्व आहे. भारतामध्ये काही भागांमध्ये कच्च्या फणसाची भाजीदेखील केली जाते. प्रामुख्याने कठोर अशा सालीखालील पिकलेल्या फणसांचे गर काढून खाणे पसंत केले जाते.

फणस हा पोषणमूल्याच्या दृष्टीने पौष्टिक असतो. फणसाच्या गरापेक्षा फणसाच्या बियांमध्ये कार्बोहायड्रेट्स, प्रोटीन्स आणि खनिजे तुलनात्मकदृष्ट्या जास्त प्रमाणात असतात. त्यामुळे फणसाच्या बिया भाजून किंवा उकडून खाणे कोकणात फारच लोकप्रिय आहे. कोकणात फणसाची कच्ची फळे भाजी करण्यासाठी वापरतात. फणसाच्या फळांचे गर आणि बी सोडून राहिलेल्या ५५ ते ६५ % फळाचा भाग जनावरांना खाद्य म्हणून वापरता येतो. फणसाच्या गरापासून पापड आणि सुकविलेले पदार्थ तयार करता येतात. फणसापासून फणसपोळी, जॅम, जेली, सरबत, लोणचे इत्यादी विविध टिकाऊ पदार्थ तयार करता येतात. कापा फणसाचे गरे हवाबंद डब्यात भरून साठविता येतात.

एक कप कच्च्या फणसाच्या रसात साधारण १५५ कॅलरीज आढळत असल्याचे अभ्यासकांनी नोंदवले आहे.

फणसामध्ये सोडिअमचे प्रमाण कमी असून, कोलेस्ट्रॉल आणि चरबीवर नियंत्रण मिळते.

आरोग्यासाठी महत्त्वाचे जीवनसत्त्व ए, सी, रायबोफ्लेविन, निॲसिन, थायमिन आणि फोलेट हे घटक फणसात आहेत.

फणसामध्ये आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक असणारी मॅग्नेशिअम, कॅल्शिअम, लोह, पोटॅशिअम, फॉस्फरस, कॉपर, झिंक आणि सेलेनियम ही खनिजे आहेत.

फणस हा फायबरचा मोठा स्त्रोत असून ११ टक्क्यांपर्यंत फायबर फणसापासून मिळते.

फणसामध्ये कोणत्याही प्रकारची साखर नसल्यामुळे मधुमेह झालेल्यांसाठी महत्त्वाचे फळ. फ्रुक्टोज आणि सुक्रोजचं प्रमाण योग्य असल्याने शरीरात ऊर्जेचा स्त्रोत राखण्यास मदत होते.

फणसातील पोषणद्रव्यांमध्ये कर्करोगविरोधी, क्षरणविरोधी आणि अल्सरविरोधी घटक असल्यामुळे ती अनेक रोगांवर गुणकारी आहे. म्हणजेच रसाळ गर असलेले फणस आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे.

फणसाच्या झाडाची मुळं पाण्यात उकळून त्याची वाफ घेतल्यास अस्थमाच्या रुग्णांना आराम पडतो. फणसाच्या गरात तांबं अधिक प्रमाणात असल्याने थायरॉईड ग्रंथीचं कार्य सुधारतं.

सुधारित जाती : फणसामध्ये फळाचा आकार आणि गराचा रंग, मऊपणा, इत्यादींवरून वेगवेगळ्या स्थानिक जाती प्रचलित आहेत. फणसाच्या झाडाचे गराच्या मऊपणा-वरून 'कापा' आणि 'बरका' असे दोन प्रमुख प्रकार पडतात. फळांच्या बाह्य स्वरूपावरून कापा आणि बरका या जातीची फळे ओळखण्यास शक्य होत नाही. यासाठी मूळ झाडांची माहिती असणे आवश्यक असते.

१) कापा फणस : कापा प्रकारच्या फणसाच्या फळातील गरे कोरडे, खुसखुशीत, गोड आणि उत्तम स्वादाचे असतात. गरे पिवळे, पिवळे जर्द किंवा केशरी रंगाचे असतात. कापा फणसाचे गरे मीठ लावून तळल्यास चांगले खुसखुशीत लागतात. पिकलेले गरे हवाबंद डब्यात साठविता येतात. म्हणून कापा फणसांना बाजारात चांगली मागणी असते.

२) बरका फणस : बरका प्रकारच्या फळांचे गरे मऊ, रसाळ आणि भरपूर प्रमाणात रेषा असलेले आढळतात. अशा गरांपासून प्रामुख्याने फणसपोळी आणि घारगे तयार करतात. ह्या फणसाचे गरे जास्त काळ टिकत नाहीत, परंतु या फणसाच्या गऱ्यांपासून तयार केलेली फणसपोळी वर्षभर साठविता येते.

३) सिंगापुरी फणस : सिंगापुरी जातीचे फणस दक्षिण भारतात काही ठिकाणी आढळून येतात. ही जात श्रीलंकेतून आणण्यात आली आहे. या जातीच्या फळांना अडीच ते तीन वर्षांनी फळे धरण्यास सुरुवात होते. ही भरपूर उत्पादन देणारी जात असून या जातीची फळे मोठी आणि मध्यम दर्जाची असतात.

४) नारळी फणस : कोल्हापूर जिल्ह्यात आजरा या गावी फणसाचे झाड निवड पद्धतीने शोधून काढले आहे. या फणसाची फळे नारळाच्या आकाराएवढी असतात. म्हणून यास नारळी फणस असे म्हणतात. नारळी फणसाच्या एका फळाचे वजन दोन किलोपर्यंत असते. या जातीच्या फणसाचे गरे कापा प्रकारचे

असतात. सर्वसाधारणपणे फणसाच्या मोठ्या फळात २७% गरे आणि १६% बी आढळते. तर नारळी फणसात ५०% गरे आणि ५०% बी असते.

५) गुलाबी गराचा फणस : कोल्हापूर जिल्ह्यातील खानापूर येथे गुलाबी रंगाचे, कापा प्रकारचे गोड आणि उत्कृष्ट स्वादाचे गरे असलेले फणसाचे झाड निवड पद्धतीने शोधून काढण्यात आले आहे. या झाडाची फळे सर्वसाधारणपणे ३ ते ५ किलो वजनाची असतात. काही फळांचे वजन ७ ते १० किलोपर्यंत असते. या फळातील गरांना विशिष्ट प्रकारचा रुचकर आणि गोड स्वाद असतो. या फणसाचे गरे गुलाबी रंगाचे, मधासारखे गोड, जाड आणि घट्ट असतात.

६) रुद्राक्षी फणस : रुद्राक्षी फणसाची फळे आकाराने गोल आणि मोठी असतात. या जातीच्या फळाची साल बाहेरच्या बाजूने मऊ आणि कमी काटेरी असते. परंतु फळाची प्रत कमी दर्जाची असते.

**फणस आणि आरोग्य –**

१) **झटपट एनर्जी मिळते** – फणसामध्ये कार्बोहायड्रेट्स आणि साखर मुबलक प्रमाणात आढळतात. फणसातून ९२% कार्बोहायट्रेस मिळतात. सुमारे कपभर फणसाच्या गरामध्ये ४०ग्रॅम कार्बोहायड्रेट्स असतात. दोन जेवणा-दरम्यान लागणाऱ्या भुकेवर नियंत्रण मिळवण्यासाठी फणस मदत करतो. आरोग्यदायी मार्गाने वजन वाढवणाऱ्या-साठी फणस अत्यंत फायदेशीर आहे.

२) **थायरॉईडची समस्या आटोक्यात राहते** – फळांमधून शरीराला मिनरल्सचा पुरवठा होतो. फणसामध्ये कॉपर घटक मुबलक असतात. त्याचा फायदा थायरॉईडचा त्रास आटोक्यात ठेवण्यास होतो. शरीरातील थायरॉईड हार्मोन्स नियंत्रणात ठेवण्यास मदत होते.

३) **रोगप्रतिकारशक्ती सुधारते** – व्हिटॅमिन सी युक्त फळांच्या सेवनामुळे नैसर्गिकरीत्या शरीराची रोगप्रतिकारशक्ती सुधारायला मदत होते. फणसामध्ये व्हिटॅमिन सीच्या सोबतीने साखरही मुबलक असते. त्यामुळे शरीराची रोगप्रतिकारशक्ती सुधारते.

४) **रक्तदाब नियंत्रणात राहतो** – दिवसभरातील शरीराला आवश्यक पोटॅशियमच्या गरजेपैकी १४% गरज केवळ कपभर फणसाच्या गरांमधून पूर्ण होते. पोटॅशियमयुक्त हे फळ रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यास मदत करतो. परिणामी रक्तदाबासोबतच वाढणारा हृदयविकाराचा धोकाही आटोक्यात राहतो.

५) **पचन सुधारते** – फणसामध्ये डाएटरी फायबर्स आणि पाण्याचे प्रमाणही मुबलक असते. यामुळे पचनक्रिया सुधारते, बद्धकोष्ठतेचा त्रास कमी होतो. आयुर्वेदानुसार, लहान आकाराचा कच्चा / भाजीचा फणस पचनक्रियेचा त्रास असणाऱ्यांसाठी पचायला कठीण, त्रासदायक ठरू शकतो.

६) **दृष्टिदोष कमी होतात** – फणसामध्ये नैसर्गिकरीत्या अ‍ॅन्टी-ऑक्सिडंट घटक, फ्लॅवोनॉईड्स मुबलक आढळतात. यामुळे रेटिनल सेल्सना फ्री ऑक्सिजन रॅडिकल्सचा त्रास कमी होतो. यामुळे Macular Degeneration किंवा मोतिबिंदूचा त्रास वाढण्याचा धोका असतो. पण फणसातील व्हिटॅमिन ए च्या मुबलक प्रमाणामुळे हा त्रास आटोक्यात ठेवण्यास मदत होते.

७) **कॅन्सरचा धोका कमी होतो** – फणसामधील अ‍ॅन्टीऑक्सिडंट घटक फ्री रॅडिकल्सचा धोका कमी करतात. फणसाचा गर चिकट आणि स्टार्ची असल्याने आतड्यांमधील घातक घटक बाहेर काढण्यास, पचनक्रिया सुधाण्यास मदत करतात. प्रामुख्याने आतड्याच्या कॅन्सरचा धोका कमी होतो.

८) **अ‍ॅनिमिया** – लाल रक्तपेशी आणि हिमोग्लोबीन यांचे कार्य नियमित राहण्यासाठी शरीरात मिनरल्स आणि व्हिटॅमिन्स मुबलक प्रमाणात लागतात. फणसामाध्ये व्हिटॅमिन ए,सी आणि के यांचे प्रमाण मुबलक असते सोबतच फॉलिक अ‍ॅसिड, नायसिन, व्हिटॅमिन बी ६ मुबलक आढळतात. तसेच लाल रक्तपेशींना चालना देणारे मॅंगनीज, मॅग्नेशियम, कॉपर घटक फणसात मुबलक आढळत असल्याने अ‍ॅनिमियाचा त्रास आटोक्यात राहण्यास मदत होते.

९) **हाडांना बळकटी मिळते** – हाडांना बळकटी देण्यासाठी कॅल्शियम आवश्यक असते हे आपण जाणतोच. फणसाच्या सुमारे मूठभर गरांमुळे शरीराला ५६.१ मिलीग्रॅम कॅल्शियमचा पुरवठा होतो. ज्यामुळे ६% नियमित कॅल्शियमची गरज पूर्ण होण्यास मदत होते. त्यामुळे ऑस्टोपोरायसिसचा त्रास असणाऱ्यांना फणसातून नैसर्गिकरीत्या कॅल्शियम मिळते.

१०) **त्वचा आरोग्यदायी राहते** – इतर फळांप्रमाणेच फणसामध्येही अ‍ॅन्टीऑक्सिडंट्स मुबलक असतात. यामुळे त्वचेचे नुकसान होण्यापासून, चेहऱ्यावरील सुरकुत्यांचा त्रास आटोक्यात राहण्यास मदत होते.

११) **स्पर्म काऊंट (शुक्राणू) सुधारतात** – आयुर्वेदानुसार, पिकलेला फणस खाल्ल्याने स्पर्म्सची मोबिलिटी आणि वीर्याचा दर्जा सुधारण्यास मदत होते. यामुळे पुरुषांमधील इन्फर्टीलिटीचा त्रासही आटोक्यात राहतो. कामवासना सुधारण्यासाठी, शीघ्रपतन, यासारखे त्रास कमी करण्यासाठी फणसाचे सेवन फायदेशीर ठरू शकते .

सौजन्य:– **डॉ.जितेंद्र घोसाळकर**
धन्वंतरी उपचार मो.नं. ७७९८६१७२२२

व्यक्तिविशेष / परिचय



## श्री. सतीशचंद्र विद्याधर हर्डीकर

१६ए, धसवाडी ठाकुरद्वार,
मुंबई ४००००२

**जन्म** : १.०९.१९५८ ब्राह्मणसभा, गिरगाव, मुंबई
**शिक्षण** : एम्.कॉम. सी.ए.आय.आय.बी.
(M.Com.,C.A.I.I.B.)
**शाळा:** चिकित्सक समूह शिरोळकर हायस्कूल, गिरगांव
**महाविद्यालय** : एच्. आर. महाविद्यालय, चर्चगेट, मुंबई विद्यापिठ
**नोकरी:** बँक ऑफ बडौदा, १० ऑक्टोबर १९७८, मुंबई
**अधिकारी म्हणून–**
गुजरात, तमिळनाडू, दिल्ली
**परदेशात–**
ब्रुसेल्स, बेल्जियम, युरोप येथे बँकिंग कामाचा अनुभव
**परदेश विनिमय–**
(Foreign Exchange) कर्ज, विधी इत्यादी विषयांत प्राविण्य.
**सद्यस्थितीत–**
महाप्रबंधक (General Manager)
(प्रमुख, ठेवी प्रबंधन)
**इतर कार्यानुभव –**
मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाकुरद्वार शाखा कार्यवाह – (सन १९८५ ते १९९८)
विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी कार्यकर्ता
यंग झिंगारो ट्रेकर्स, मुंबई–
अंध सह्याद्री मोहिमा
युथ हॉस्टेल असोसिएशन (YHA) नवी दिल्ली
हिमालयीन पदभ्रमण मोहिमा (१९८१ ते १९९४)
हिमालयीन लडाखी शितिधर मोहीम यशस्वी (मे १९९३)

– श्री. प्रसाद पंडित, क.ब्रा. संघ, मुंबई

## रसा रक्षणार्थ

ध्वनी, वायू पाणी प्रदूषण
संपेल ना होऽ हवेतील ओझोन
अन्नात भेसळ करतंय कोण?...
नकोसं झालंय आता हे जीवन

नैतिकताच हरवून बसलोय आपण
जागण्याचा हक्क घेतोय हिरावून

जगतोय का? मग जीवघेण जीणं
करू या ना आता जलसंवर्धन

बदलून टाकू सारे वातावरण
वृक्षलतांचे करून संगोपन

यशस्वी व्हायचा करू 'पण'
राबवायचं आहे 'स्वच्छता अभियान'

उजळून जातील सारे क्षण
प्राप्त होईल आरोग्य धन

चला करू पर्यावरण रक्षण
रसा रक्षणार्थ सिद्ध हे जन

कटिबद्ध होऊ स्वयं आपण
सहकार्याने घडवू जीवन

सौ. अंजली प्रसाद पंडित, मुंबई

### संस्कृत सुभाषित

आपण मराठीमध्ये नेहमी वा न वा। (वानवा) हा शब्द वापरतो, त्याचे मूळ या श्लोकात आहे.

**शतेषु जायते शूरः सहस्रेषु च पण्डितः।**
**वक्ता दशसहस्रेषु दाता भवति वा न वा॥**

शंभरामधे एकजण शूर निपजतो, सहस्रामध्ये एक पण्डित, दशसहस्रामध्ये एक वक्ता. देणारा दाता मात्र, होतो किंवा होत नाही.

* कऱ्हाडे ब्राह्मण महासंघास हार्दिक शुभेच्छा! *
श्री. प्रसाद प्रभाकर पंडित, मुंबई
मो. ९२२३४ ५०९००

# पितांबरीतर्फे देवभक्ती अगरबत्ती निर्मितीच्या कारखान्याचा शुभारंभ

पितांबरी प्रॉडक्टस् प्रा.लि. ने दापोलीजवळ साखळोली येथे आयुर्तेज गार्डन हे दापोली परिसरातील पहिले आणि एकमेव आयुर्वेद उद्यान विकसित केले आहे. ५५ एकरहून विस्तीर्ण अशा या परिसरातच असंख्य सुगंधी फुलांची व सुगंधी गवताची सुयोजित लागवड करण्यात आली आहे. या फुलांच्या आणि सुगंधी गवताच्या नैसर्गिक अर्कापासून देवभक्ती अगरबत्ती बाजारात उपलब्ध करण्यात आली आहे. या अगरबत्तीच्या निर्मितीसाठी अद्ययावत यंत्रसामग्री आणि अत्याधुनिक यंत्रणांनी सज्ज असा कारखाना याच परिसरात निर्माण करण्यात आला आहे.

या कारखान्याचा शुभारंभ गुरुवार दि. २८ जून २०१८ रोजी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोलीचे डायरेक्टर ऑफ एक्स्टेंशन मा. डॉ. संजय भावे साहेब यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी दापोली येथील वनीकरण महाविद्यालयाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. अजय राणे तसेच पितांबरी व्यवस्थापकीय संचालक श्री. रविंद्र प्रभुदेसाई, मार्केटिंग डायरेक्टर श्री. परीक्षित प्रभुदेसाई, कार्यकारी संचालक श्री. अजय जोशी आणि पितांबरीचे अन्य अधिकारी उपस्थित होते.

अगरबत्ती निर्मितीसाठी आवश्यक असलेला फुलांचा व सुगंधी गवताचा अर्क काढण्यापासून त्याची गुणवत्ता मानांकन, तपासणी पर्यंत सर्व प्रक्रिया या ठिकाणी केल्या जाणार आहेत. भारतभरात तसेच विदेशातही पाठविण्यात येणाऱ्या देवभक्ती अगरबत्यांची निर्मिती या कारखान्यात केली जाणार आहे. अशी माहिती मा. रविंद्र प्रभुदेसाई यांनी या प्रसंगी दिली.



पितांबरी देवभक्ती अगरबत्ती कारखान्याचे उदघाटन करताना डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे डॉ. संजय भावे. सोबत पितांबरीचे व्यवस्थापकीय संचालक मा. रविंद्र प्रभुदेसाई, मार्केटिंग डायरेक्टर श्री. परीक्षित प्रभुदेसाई, कार्यकारी संचालक श्री. अजय जोशी व अन्य मान्यवर

कोकणातील शेतकऱ्यांच्या जमिनीत लागवड करून रोजगार निर्मिती व्हावी, त्यांची आर्थिक उन्नती व्हावी यासाठी पितांबरी उद्योग समुहाने पुढाकार घेतला आहे.

दापोली साखळोली बरोबरच सौंदळ, पेढांबे, ताम्हाणे आदि ठिकाणी आपले काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. कोकणातील ग्रामीण भागात पितांबरी उद्योग समुहाने येथील शेतकरी, बागायतदार यांच्यासाठी विविध प्रकारच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. पितांबरी दद्योग समुहाने परफ्युम (सुगंधी द्रव्ये), हेल्थ-केअर, फुड डिव्हिजन, होम-केअर, सॉफ्टवेअर डिव्हिजन, सोलर डिव्हिजन तसेच ॲग्रो टुरिझम अशा विविध क्षेत्रात या समुहाचा विस्तार केल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. तालुक्यातील साखळोली येथील कारखान्यात तब्बल शंभर जणांना रोजगार उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी सांगितले. कोकणासाठी सुगंध समृद्धी कोकण विकास संस्था ही सामाजिक संस्था आपण स्थापन केली असून त्या माध्यमातून राजापूर येथील आपल्या गावी सौंदळ येथे लेमन ग्रासची लागवड करून शेतकऱ्यांना रोजगार उपलब्ध केल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. ताम्हाणे, पेढांबे येथेही आपले युनिट सुरू असून कातळ भागावर बांबू लागवड केल्यास त्यापासून काडी बनविण्याचा नवीन रोजगारही मिळू शकतो. यासाठी आपण अशा जमिनी लीजवर घेण्यास तयार आहोत. शेतकरी प्रशिक्षण लागवड, संशोधन यासाठी येथील कृषी विद्यापीठातील कृषी शास्त्रज्ञ संचालक यांचे मार्गदर्शन व सहकार्य घेण्यात आल्याचे ते म्हणाले. केमिकल विरहित गुळाचीही निर्मिती करण्यात आली असून पितांबरी देशात सर्वत्र व परदेशातही पोहोचल्याची माहिती मार्केटिंग डायरेक्टर परीक्षित प्रभुदेसाई यांनी दिली.

येथे निसर्गाने भरभरून दिले आहे. कोकणातील निसर्गसौंदर्य हवामान हे केरळ व कर्नाटकप्रमाणेच आहे. येथेही चंदन, रक्तचंदनाची लागवड होऊ शकते. यातूनही मोठी रोजगार निर्मिती होईल. आपण शेकडो एकरवर विविध औषधी वनस्पती, विविध फुलझाडे यांची लागवड करून यामधूनच उद्योग निर्मिती करून रोजगाराच्या संधी दिल्या. हे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय उद्योजक येथे येऊन बघतील तेव्हा येथील पर्यटन व्यवसायालाही चालना मिळेल, असा विश्वास श्री. प्रभुदेसाई यांनी यावेळी व्यक्त केला.


– श्री. उदय आगाशे
पितांबरी उद्योग समुह
मो. ९८६९७ ३०८०२

# लक्ष्मणरावांची उद्यमनगरी

कर्नाटकातील धारवाडजवळच्या गुर्लहोसूर गावाने देशाला दोन सुपुत्र दिले. आधुनिक मराठी रंगभूमीचे आद्य नाटककार कै. बळवंत पांडुरंग तथा अण्णासाहेब किर्लोस्कर (जन्म ३१ मार्च १८४३, मृत्यू २ नोव्हेंबर १८८५) आणि 'महाराष्ट्राचे हेन्री फोर्ड' म्हणून संबोधले जाणारे लक्ष्मणराव काशिनाथ किर्लोस्कर (२० जून १८६९-२६ सप्टेंबर १९५६). १८८० मध्ये अण्णासाहेबांनी 'शाकुंतल' व पाठोपाठ 'सौभद्र' लिहून सांस्कृतिक भावजीवनात एक अध्याय लिहिला, तर १८८८ मध्ये 'किर्लोस्कर ब्रदर्स' नी महाराष्ट्राच्या औद्योगिक क्षेत्रात मानाचे पान लिहिले.

२६ मार्च १९१० रोजी वयाची चाळिशी पार केलेले लक्ष्मणराव अपुरी साधने, पण प्रचंड मोठी स्वप्नं घेऊन रेल्वेच्या कुडल रोड स्टेशनवर सहकाऱ्यांसह उतरले. तिथे निवडुंगाच्या काटेरी वनात किर्लोस्करवाडीची उद्यमनगरी उभी राहिली. मात्र, मातृछत्र लहानपणीच हरपलेल्या लक्ष्मणरावांची त्या आधीची वाटचाल विलक्षण संघर्षमय आहे.

वयाच्या पंधराव्या वर्षी लक्ष्मणरावांनी चित्रकला व यंत्रविद्या यात शिक्षण घ्यायचे असल्याचे वडिलांना सांगितले. प्रवासापुरते पैसे घेऊन लक्ष्मणरावांनी मुंबई गाठली. नव्याने सुरू झालेल्या जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्‌समध्ये त्यांनी प्रवेश घेतला व तिन्ही ग्रेड्‌सच्या परीक्षा दिल्या. पण, डोळ्यांना रंगाची परीक्षा करता येत नसल्याने ते त्यांच्या आवडत्या यंत्रकलेकडे वळले. नुकत्याच सुरू झालेल्या व्ही. जे. टी. आय. या टेक्निकल स्कूलचे ड्रॉइंग टीचर झाले. पण जवळच्या वर्कशॉपमध्ये लेथ, ड्रिलिंग मशिन, शेपिंग मशिन्स या यंत्रात



रमू लागले 'अमेरिकन मशिनिस्ट,' 'सायंटिफिक अमेरिकन' यांसारखे यंत्रविषयक साहित्य वाचणे, त्याची टिपणे करून स्वत: प्रयोग करणे, हे पुरू होते. एका जुन्या छापखान्यात सुधारित छपाई यंत्र मागवून ते बसवून देण्याचे कामही त्यांनी पुरे केले. तसेच, ग्रँड ईस्टर्न मिलसाठी लागणाऱ्या यंत्राची ड्रॉइंग व अन्य कामे करून देण्यात पुढाकार घेतला.

१८८७ च्या सुमारास काही पारशी मंडळी सायकल चालवताना दिसली. त्यांनी इंग्लंड, अमेरिकेतून या नव्या वाहनाबद्दल माहिती मागवली. सुटे भाग, जुळणी, दुरुस्तीत प्रावीण्य मिळवून दोन सायकली बेळगावला मोठ्या बंधूकडे पाठवल्या. 'किर्लोस्कर ब्रदर्स' या नावाने १८८८ मध्ये सायकलचे विक्रेते म्हणून सुरू झालेल्या 'किर्लोस्कर ब्रदर्स लि.' चा उद्योग आज जगभर फैलावला आहे.

१८९७ मध्ये पत्नी राधाबाईसह ते बेळगावला आले. १९०१ मध्ये वैरण कापणीचे यंत्र स्वत: कल्पकतेने तयार केले.

अमेरिकन 'फौंड्री' या मासिकाच्या आधारे प्रयोग करून त्यांनी लोखंडी नांगर तयार केले. लाकडी नांगराच्या जागी आलेल्या या नव्या नांगराने एका मोठ्या औद्योगिक घटनेची नोंद झाली. लक्ष्मणरावांचे मुंबईचे सहाध्यायी, औंध संस्थानचे युवराज बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी कुंडल रोडजवळ देऊ केलेल्या जागेत लक्ष्मणरावांनी किर्लोस्करवाडी वसवली. जातिभेद, दुष्ट चालीरीती उखडून त्यांनी आधुनिक विचारांचे नगर वसवले. शिक्षा भोगणाऱ्या पिऱ्या, तुक्या या गुन्हेगारांना वाडीचे संरक्षक नेमले.

थायलंडमध्ये भयंकर पावसाने थैमान घातल्याने आलेल्या पुरामुळे जंगलात, आपल्या प्रशिक्षकाबरोबर ट्रेकींगला गेलेली फुटबॉल टीमची बारा (१२) तरूण मुले, एका पाच कि.मी. हून मोठ्या असलेल्या गुहेत पुराच्या पाण्यात अडकली होती. सतरा दिवस अडकून पडलेल्या या तरूण मुलांना त्यांच्या प्रशिक्षकासह पाण्यातून सुखरूप बाहेर काढण्यासाठी किर्लोस्कर ब्रदर्सच्या फ्लड पंप्सची खूप मदत झाली. जगभर चर्चेचा विषय झालेल्या ह्या घटनेत सर्वजण दि. १० जुलै २०१८ पर्यंत सुखरूप बाहेर आले. किर्लोस्कर ब्रदर्सचे अधिकारी श्री. प्रसाद कुलकर्णी आणि त्यांची सर्व टीम यांनी या बाबतीत दिलेल्या त्यांच्या योगदानामुळे, ते सर्वजण अभिनंदनास पात्र आहेत. इतर देशांचीही या 'सुटका-नाट्यात' भरीव मदत झाली आहे. त्यामुळे त्यांच्या बरोबरच भारताची मान उंचावली आहे.

यंत्र कितीही कुशल असले, तरी माणूस व त्याची बुद्धी, कौशल्य महत्त्वाचे आहे, असे मानणाऱ्या लक्ष्मणराव आणि त्यांच्या किर्लोस्कर परंपरेला अभिवादन.

संपादक



# पक्ष्यांची मरणोन्नवस्था

जंगलातील झाडावरला
पक्षी मरून खाली पडला
अन् झाडातून अश्रू ठबकला
कारण,
झाड मुकले होते गाण्याला..................१
निळ्याभोर आकाशातील
पक्षी मरून खाली पडला
जाण ना त्याची आकाशाला
कारण,
त्याची पोकळी ना जाणवली आकाशाला.....२
रस्त्यावरील झाडावरला
पक्षी मरून खाली पडला
अन् त्या मूक बिचाऱ्या पक्ष्याला
ना मिळाली माती झाकावयाला.....३
सागरात पक्षी मरून पडला
लाटे बरोबर वाहून गेला
कुणाच्या भक्ष्यस्थानी पडला?
त्याचा थांग ना लागला कुणाला............४

– **श्रीहरी गुणे**
नवी पेठ, पुणे

# * भास *

हिरव्या हिरव्यागार हरळीवर
शुभ्र धवल कबुतरांचा थवा
भास जणू काही एक तुकडा हिमाचा................१

हिरव्यागार उंच झाडाच्या शेंड्यावर
काळ्या कुळकुळीत कावळ्यांचा थवा
भास झाला जणू उघडलेल्या छत्रीचा.......२


पदपथावर रंगी-बेरंगी फुलझाडे
प्रभात समयी पदपथावर फुलांचे सडे
भास जणू फुलांचा गालीचा दोन्हीकडे..............३

पाऊस पाहिला पडताना हिमाचा
भास जणू वर्षाव शुभ्र फुलांचा
भासे हा खेळ मनाचा, क्षणिक आनंदाचा...४

– **श्रीहरी गुणे**
नवी पेठ, पुणे

*** खाद्यसंस्कृती ***

# रताळ्याची कचोरी



**साहित्य :** २५० ग्रॅम रताळी, १ मोठा बटाटा, मीठ, १ मूठ चिरलेली कोथिंबीर, १ वाटी किसलेले खोबरे, ४/५ हिरव्या मिरच्या, ५० ग्रॅम बेदाणा व साखर.

**कृती :** रताळी उकडून, सोलून, कुस्करून घ्या. त्यात थोडे मीठ घाला. १/२ चमचा तुपावर मिरच्या परतून त्यात कोथिंबीर, खोबरे, बेदाणा, साखर घालून भांडे गॅसवरून खाली उतरवून सारण तयार करा. रताळ्याची पारी तयार करून त्यात सारण भरून कचोरी करा व वऱ्याच्या तांदळाच्या पिठात घोळून तुपात तळा. रताळ्याची उत्तम कचोरी उपवासासाठी तय्यार.

– कमला कळके

## संस्कृत सुभाषित

**स्थानभ्रष्टा न शोभन्ते दन्ता केशा नखा नराः ।**
**इति विज्ञाय मतिमान् स्वस्थानं न परित्यजेत् ।।**

अर्थ : दात, केस, नखे आणि माणसे त्यांच्या योग्य जागेवरुन हलल्यास किंवा पडल्यास त्यांची शोभा जाते. हे जाणून विद्वान माणसाने आपली जागा सोडू नये.

## फोटोंची अदलाबदल

'संपर्क' त्रैमासिकाच्या एप्रिल-जून २०१८ च्या अंकात, पान नं. ४ वर प्राणाचार्य वैद्यभूषण पुरुषोत्तमशास्त्री हिर्लेकर, अमरावती ह्यांचा फोटो नजरचुकीने पान नं. ७ वर छापला गेला आहे. तसेच वैद्य श्रीनिवास पुरुषोत्तम हिर्लेकर ह्यांचा पान नं. ७ वर हवा असणारा फोटो नजरचुकीने पान नं. ४ वर छापला गेला आहे. थोडक्यात पान नं. ४ व पान नं. ७ वर फोटोंची अदलाबदल नजरचुकीने झालेली आहे. त्याबद्दल आम्ही दिलगिरी व्यक्त करतो.

– संपादक


WWW.2FACTOR.IN
Promote Your Business
Acquire New Customers
Deepen Customer Relationship
BULK SMS
marketing
12%
of facebook posts are read
29%
of tweets are read
31%
of emails are opened
98%
of text messages are read
CHECKED
150
TIMES A DAY
The average person looks at their phone 150 times a day
MOBILE ADS
75%
of people prefer receiving marketing messages via SMS
15%
prefer receiving email ads
10%
prefer in-app or push ads
Solv Technologies
2Factor, Solv Technologies,
19-02, B-Wing, Peninsula Business Park,
Lower Parel, Mumbai 400013
www.2Factor.in
95-5459-5459

# कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाची सभा - रत्नागिरी





सावंतवाडी येथील फेब्रुवारी २०१८ च्या महासंघाच्या सभेत रत्नागिरी कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या त्रैमासिक सभा आयोजनाच्या प्रस्तावाला महासंघाने स्वीकृती दिल्यानुसार प्रस्तावित सभा आणि विशेष कार्यक्रम दि. २७ मे २०१८ रोजी रत्नागिरी कऱ्हाडे ब्राह्मण संघ मर्या. रत्नागिरी; ह्यांनी आयोजित केला आणि तो उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

सदर सभेला बडोदे, नाशिक, नागपूर, डोंबिवली, ठाणे, मुंबई, पुणे, सातारा, कोल्हापूर, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी येथील संघांचे प्रतिनिधी उपस्थित होते. सभेचे कामकाज महासंघाचे अध्यक्ष, मा. श्री. विजयजी आंबर्डेकर व कार्यवाह, मा. श्री. गणेशजी गुर्जर, यांचे अधिपत्याखाली अतिशय खेळीमेळीने व उत्साहात संपन्न झाले.

मा. विजयजी आंबर्डेकर यांचे हस्ते राणी लक्ष्मीबाईंच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून मान्यवरांचे हस्ते दीपप्रज्वलन आणि गणेशपूजन होऊन सभेच्या कामकाजास सुरुवात झाली. सर्व सभासदांनी दिवंगत ज्ञातिबांधवांना श्रद्धांजली अर्पण केली.

सर्व प्रतिनिधी व रत्नागिरी संघाचे पदाधिकारी यांचा परिचय करून देण्यात आला व सर्व प्रतिनिधींचे स्वागत, आमरसाची कुपी व 'आविष्कार' या मतिमंद शाळेच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेली फुले देऊन करण्यात आले. त्यानंतर सभेच्या विषयपत्रिकेप्रमाणे सभेचे कामकाज विहित पद्धतीनुसार पार पडले. सर्व विषयावर सांगोपांग चर्चा होऊन त्यानुसार निर्णय घेण्यात आले. खास कोकणी 'वैशाखी' भोजनोत्तर सभेचे कामकाज दुपारी ३.३० वाजता संपन्न झाले. सभेचे सूत्रसंचालन श्री. श्रीगजाननजी गुर्जर, संपादक 'संपर्क' यांनी केले.

त्यानंतर महासंघाने निश्चित केलेल्या कार्यक्रमानुसार वैवाहिक जीवनास ५० वर्षे पूर्ण झालेल्या निमंत्रित जोडप्यांचा सत्कार व अभिष्टचिंतन; महासंघाचे पदाधिकारी व रत्नागिरी संघाचे पदाधिकारी, मा. अध्यक्ष विजय आंबर्डेकर, सचिव मा. गणेश गुर्जर, 'संपर्क' संपादक मा. श्रीगजानन गुर्जर, रत्नागिरी संघाचे अध्यक्ष मा.श्री. माधव हिर्लेकर, पूर्वसचिव सुहास भागवत आणि मा. गोपाळ भाटवडेकर यांचे हस्ते भेटवस्तू, शाल, श्रीफळ व 'आविष्कार' गुच्छ देऊन करण्यात आले. सत्कारमूर्ती पुढीलप्रमाणे:

१. **ॲड. पु. ल. महाजनी व सौ. विद्या महाजनी,** नामवंत वकील, रत्नागिरी संघाचे १२ वर्षे सल्लागार व पत्नी-गृहिणी

२. **श्री. भा. न. शहाणे व सौ. प्रभावती शहाणे**-देवरूख निवृत्त विमा अधिकारी, देवरूख ब्राह्मण व ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष, पत्नी -गृहिणी

३. **श्री. के. प. पाध्ये व सौ. कालिंदी पाध्ये,** माभळे, ता. संगमेश्वर अकाऊंटंट, २१ गणेशयाग संपन्न केले. पत्नी - गृहिणी

४. **श्री. हणमंत शंकर रायकर व सौ. अनुराधा रायकर,** राजापूर निवृत्त शासकीय कर्मचारी, लेखक, इंग्रजी संभाषण व व्यक्तिमत्त्व विकास यावर व्याख्याने देतात. तसेच या विषयांवरील स्वतःच्या चार पुस्तकांचे प्रकाशन केले आहे. पत्नी- भजन व हार्मोनियमचे वर्ग घेतात.

५. **श्री. नारायण दत्तात्रय तांबे व सौ. सुशीला,** कोलधे, ता. लांजा. शेती, पत्नी-गृहिणी.

यानंतर विशेष कार्य करणाऱ्या पाच ज्ञातीबांधवांचा सत्कार करण्यात आला.

पान २६ वर

Regd.Periodical RNI- No. MAHAMAR/2013/51438 (DECL.No. SDM/PUNE/SR/89/2013)



BOOK -POST(Regd. Periodical)

प्रेषक:

संपादक - कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे 'संपर्क'
कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ
द्वारा - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ,
'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ,
पुणे- ४११ ०३० फोन : ०२० २४४३ २४४३.

To,